


# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २१.०८.२०२६ | अंक नं. १२१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020


## ऐन सणासुदीच्या काळात साखरेच्या दरात मोठी वाढ

### किरकोळ बाजारात ८० रुपये प्रति किलोचा टप्पा गाठला

मुंबई - देशात आणि राज्यात सध्या वाढत्या महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यातच अवघ्या ३ महिन्यांत साखरेच्या किमती तब्बल ४० टक्केने वाढल्याने किरकोळ बाजारात साखरेने ८० रुपये प्रति किलोचा टप्पा गाठला आहे.

राज्यातील बाजारपेठेत सध्या साखर कडू झाली असून, ग्राहकांच्या खिशाला मोठा कात्री बसत आहे. साखरेच्या दराने इतिहासातील सर्व उच्चांक मोडीत काढले असून, घाऊक बाजारात दर ७,५०० रुपये प्रति क्विंटलवर पोहोचले आहेत. किरकोळ बाजारात तर साखर थेट ८० रुपये किलोवर विकली जात आहे. या धक्कादायक दरवाढीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी तीव्र आक्षेप घेत सरकार आणि कारखानदारांना कटघऱ्यात उभे केले आहे. यंदाचा साठा पाहता आगामी दिवाळीपर्यंत आणि पुढील हंगामात देशाला पुरेल इतके उत्पादन उपलब्ध असतानाही ही अचानक झालेली भाववाढ संशयास्पद असून यामागे मोठा 'गौडबंगाल' आहे, असा खळबळजनक दावा शेट्टी यांनी केला आहे. यामागे साधारण २०,००० ते २२,००० कोटी रुपयांचा मोठा काळाबाजार सुरू आहे. हा पैसा शेतकऱ्यांना नव्हे, तर व्यापारी आणि रिकव्हरी चोरणाऱ्या कारखानदारांच्या घशात घालण्याचे कारस्थान आधीच ठरले होते, असा थेट आरोप राजू शेट्टी यांनी केला आहे.




जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## कमलेश साहनी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - तारकपूर येथील रहिवासी श्रीमती कमलेश सुनील साहनी (वय ६३) यांचे २१ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे सायंकाळी अंत्यसंस्कार होणार आहेत.

त्यांच्या मागे पती, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पंजाबी सेवा समितीचे संचालक सुनील साहनी यांच्या त्या पत्नी होत.

## अर्जुन राऊत यांचे दु:खद निधन



नगर - सारसनगर इवळे मळा येथील रहिवासी अर्जुन पांडुरंग राऊत (वय ७०) यांचे २१ ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. गणेश व धनंजय यांचे ते वडील होत.


## अनुसयाबाई धामणे यांचे निधन



नगर - नगर तालुक्यातील सारोळा कासार येथील रहिवासी अनुसयाबाई बाजीराव धामणे (वय ९६) यांचे २१ ऑगस्ट रोजी दुपारी १.२५ वा. वृद्धापकाळाने व दीर्घ आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कै. अनुसयाबाई यांच्यावर सारोळा कासार येथील स्मशानभूमीत सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

## नरेश मुदिगंटी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - नित्यसेवा सोसायटी, वसंत टेकडी येथील रहिवासी नरेश हिरालाल मुदिगंटी (वय ६४) यांचे १९ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ओंकार मुदिगंटी यांचे ते वडील होत.

## रेखाबाई संभार यांचे दु:खद निधन



नगर - मोहनबाग, दिल्लीगेट येथील रहिवासी सौ. रेखाबाई प्रकाश संभार (वय ६०) यांचे २० ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २१ ऑगस्ट रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, १ मुलगा, २ मुली, दीर असा परिवार आहे.

## शारदाबाई काकडे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - बिशप लॉईड कॉलनी येथील रहिवासी श्रीमती शारदाबाई बाबूराव काकडे (वय ९०) यांचे २० ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २१ ऑगस्ट रोजी सिद्धार्थनगर स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, ५ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विजय, प्रदीप, मोजेस काकडे यांच्या त्या मातोश्री होत.

## सौ. प्रतिभा रत्नपारखी यांचे दु:खद निधन



नगर - अहिल्यानगर येथील रहिवासी सौ. प्रतिभा सुभाष रत्नपारखी (वय ६९) यांचे नुकतेच निधन झाले. त्या अत्यंत दानशूर, अत्यंत मनमिळाऊ, प्रेमळ आणि धार्मिक वृत्तीच्या होत्या. आपल्या वात्सल्यमयी स्वभावाने त्यांनी कुटुंबासह समाजातील प्रत्येकाचे प्रेम मिळवले. त्या सामाजिक कार्यकर्ते अंश रत्नपारखी यांच्या आजी तसेच सुभाष गंगाधर रत्नपारखी यांच्या पत्नी व सचिन रत्नपारखी आणि वैभव रत्नपारखी यांच्या आई होत.

## मंडाबाई हजारे यांचे दु:खद निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी श्रीमती मंडाबाई सिताराम हजारे (वय ९५) यांचे २० ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २० ऑगस्ट रोजी चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कारभारी हजारे यांच्या त्या मातोश्री होत.

## लिलाबाई पिसे यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - श्री हनुमान मंदिर रोड, मोरगे वस्ती येथील रहिवासी श्रीमती लिलाबाई आनंदराव पिसे (वय ८२) यांचे २१ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, भाऊ, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अशोक पिसे यांच्या त्या मातोश्री, बापूसाहेब कृष्णाजी लोखंडे यांच्या भगिनी, अरुण, प्रकाश, संतोष व योगेश पिसे यांच्या चुलती तर विशाल बाळासाहेब पिसे व सौरभ अशोक पिसे यांच्या आजी होत.

# अहिल्यानगरमध्ये पहाटे मोठा दरोड्याचा कट पोलिसांनी उधळला

### बायपास रस्त्यावर सराईत टोळी पकडली, दोन गावठी कट्ट्यांसह लक्झरी कार जप्त



शेंडी बायपास रस्त्यावर सराईत दरोडेखोरांची टोळी पकडल्यानंतर त्यांच्यासमवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर - जिल्ह्यातील दरोडा आणि जबरी चोरीच्या गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिलेल्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. नगर जवळ दरोडा घालण्याच्या तयारीत असलेल्या सराईत गुन्हेगारांच्या पाच जणांच्या टोळीला शेंडी बायपास रस्त्यावर २१ ऑगस्ट रोजी पहाटे जेरबंद करण्यात आले असून, त्यांच्याकडून दोन गावठी कट्टे, काडतुसे आणि दोन लक्झरी कारसह एकूण ३२ लाख १९ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, एमआयडीसी ते शेंडी जाणाऱ्या बायपास रोडवर गुरदत्त मित्रमंडळ लवणवाडी पाटीजवळ काही इसम दोन काळ्या रंगाच्या विनाक्रमांकाच्या चारचाकी वाहनांच्या आडोशाला थांबून दरोडा टाकण्याचा कट रचत होते. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ पथक तयार करून संबंधित ठिकाणी छापा टाकला. अंधारात संशयास्पदरित्या उभ्या असलेल्या पाच जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान त्यांनी आपली नावे शाहरूख रज्ञाक शेख (रा. निमगाव खैरी, श्रीरामपूर), इम्रान अन्वर पठाण (रा. टाकळी, कोपरगाव), तन्जीम नदिम शेख (रा. नांदगाव रोड, येवला), फिरोज चाँद शेख (रा. नांदगाव रोड, येवला) आणि रेहान रौफ शेख (रा. श्रीरामपूर) अशी सांगितली. पोलिसांनी त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडून १ लाख ४ हजार रुपये किमतीचे दोन गावठी कट्टे, चार जिवंत काडतुसे, एक लोखंडी टॉमी, मिरची पावडर, सहा मोबाईल, १५ लाख रुपयांची काळ्या रंगाची हुंडाई क्रेटा कार आणि १२ लाख रुपयांची काळ्या रंगाची टाटा हॅरियर कार असा एकूण ३२ लाख १९ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस रेकॉर्ड तपासणीत आरोपी शाहरूख शेख आणि इम्रान पठाण हे सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले असून, त्यांच्यावर यापूर्वीच आर्म ॲक्ट, दरोडा, खूनाचा प्रयत्न यांसारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. तसेच त्यांनी हे हत्येचे साहित्य आणि कट्टे श्रीरामपूर येथील आसीफ उर्फ आश्यू पठाण आणि राजेंद्र भाऊसाहेब गांगुर्डे यांच्याकडून विकत घेतल्याची माहिती दिली असून हे दोन्ही आरोपी सध्या फरार आहेत. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या आणि आर्म ॲक्टच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. सदर कारवाई पो. नि.संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संदिप दरवडे व पोलीस अंमलदार विजय ठोंबरे, विजय पवार, सुनिल पवार, बिरप्पा करमल, राहुल डोके, आजिनाथ पाखरे, प्रशांत राठोड, रमीजराजा आत्तार, भगवान धुळे व सोनल भागवत यांच्या पथकाने केली आहे.



अवैध मावा, गुटखा पकडल्यानंतर आरोपी व मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

# नगरमध्ये गुटखा, मावा माफियांवर कारवाई

### ४१ गुन्हे दाखल, ५८ आरोपींना अटक, ९४ लाख ६८ हजारांचा मुद्देमाल जप्त

नगर - अहिल्यानगर जिल्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेने अवैध गुटखा- मावा माफियांच्या विरोधात उघडलेल्या विशेष मोहिमेत गेल्या २ महिन्यात ४१ ठिकाणी कारवाया करण्यात आल्या आहेत. या ४१ गुन्ह्यांमध्ये तब्बल ९४ लाख ६८ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी अहिल्यानगर जिल्ह्याची सूत्रे हातात घेतल्या नंतर अवैध धंद्यांच्या विरोधात कारवाईची मोहीम सुरु केली. त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेस अहिल्यानगर जिल्ह्यात अवैध मावा, पानमसाला, गुटखा, सुगंधीत तंबाखु विक्री करणाऱ्या इसमांवर कारवाई करण्याकरीता विशेष मोहिम राबवून कारवाईचे आदेश दिले आहेत.

नमूद आदेशाचे अनुषंगाने पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे वेळोवेळी पथके नेमुन विशेषतः अहिल्यानगर जिल्हयातील अवैध मावा, पानमसाला, गुटखा, सुगंधीत तंबाखु विक्री करणाऱ्या इसमांची माहिती काढुन १५ जून ते २० ऑगस्ट या कालावधीत अहिल्यानगर जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन हद्दीत छापे टाकुन कारवाई केली.

या कारवाईत ४१ गुन्हे विविध पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले असून ५८ आरोपींना अटक केली आहे. तर या सर्व कारवायांमध्ये ९४ लाख ६८ हजार २९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेकडून यापुढे देखील सातत्याने जिल्हयात अवैध मावा, गुटखा विक्री करणाऱ्यांविरूध्द कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी सांगितले.

# नगरमध्ये २६ लाख ७७ हजारांची गोवा बनावटीची अवैध दारू जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची वाळूंज बायपास रोडवर कारवाई, एकाला घेतले ताब्यात



नगर - जिल्ह्यात अवैध धंद्यांवर अंकुश ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिलेल्या आदेशांनुसार, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वाळुंज बायपास परिसरात मोठी कारवाई केली आहे. अवैध पणे वाहतूक करण्यात येत असलेला गोवा बनावटीच्या दारूचा २६ लाख ७७ हजार ९२० रुपयांचा साठा पकडला आहे. या कारवाईत वाहनचालकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली होती की, एका आयशर टेम्पोमधून (क्र. एमएच-४३-बीजी-७२८०) गोव्याची दारू वाळुंज बायपास मार्गे नेण्यात येत आहे. या माहितीच्या आधारे त्यांनी पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड पोलीस अंमलदार संतोष खैरे, विजय ठोंबरे, विशाल तनपुरे, रोहित मिसाळ, प्रताप देवकाते, भगवान थोरात, प्रशांत राठोड व सुनिल मालणकर यांच्या पथकाला कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पथकाने २० ऑगस्ट रोजी वाळुंज बायपास येथे सापळा रचला. केडगावच्या दिशेने येणारा संशयित टेम्पो अडवून तपासणी केली असता, त्यामध्ये गोव्यासाठी आरक्षित असलेला मोठ्या प्रमाणावर दारूचा साठा मिळून आला.

चौकशीदरम्यान वाहन चालक नितीन रमेश तांबसकर (वय ३५, रा. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग) याच्याकडे परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्याकडे कोणतीही कागदपत्रे आढळली नाहीत. त्याने हा साठा शत्रुघ्न किरदक (रा. धाराशीव) आणि प्रसाद सावंत (रा. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग) यांच्या सांगण्यावरून सिंधुदुर्ग भागातून भरून सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथे नेण्यात येत असल्याचे सांगितले.

पोलिसांनी या कारवाईत रॉयल स्टॅग, इंपेरियल ब्लू, मॅकडॉल नंबर १, रॉयल इन्पॅक्ट ग्रेन आणि एडरियल क्लासिक अशा विविध ब्रँडच्या दारूचे बॉक्स, आयशर टेम्पो व एक मोबाईल असा एकूण २६ लाख ७७ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या जप्त केलेल्या दारूच्या प्रत्येक बॉक्सवर 'फॉर सेल इन गोवा ओन्ली असे स्पष्ट नमूद केलेले आहे. या प्रकरणी पो.ना. प्रताप देवकाते यांच्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ऑटो एलपीजीच्या दरातील तफावत तपासून न्याय द्या अन्यथा आंदोलन करण्याचा रिक्षा चालकांचा इशारा

### ऑटो रिक्षा संघटनेचे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन



जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन देताना रिक्षा संघटनेचे पदाधिकारी.

नगर - नाशिक जिल्हा आणि अहिल्यानगर शहरातील ऑटो एलपीजी गॅसच्या दरामध्ये मोठी तफावत असल्याचा आरोप करत, या दराची तातडीने चौकशी करून गोरगरीब रिक्षा चालकांना न्याय व दिलासा द्यावा, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पुरवठा अधिकारी हेमलता बडे यांना निवेदन दिले.

संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष दत्ताभाऊ वामन, नासिर खान, सचिव अशोक औशीकर, असलम शेख, शब्बीर शेख, संजय सहाने, राजीव काळे, सुनील ठाकरे, राजेश विधाते, ज्ञानेश्वर पाताळे, सागर लांडे, एकनाथ शिंदे, इलियास बेग, नितीन मांजरे, नितीन पुंड, राकेश साळवे, आयुब सय्यद, गणेश बागल, राजू शेख, राहुल अनुभवले, आशिष ताडला, वैष्णव हरवा, किरण ठोंबे यांच्यासह मोठ्या संख्येने रिक्षाचालक उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर शहरातील रिक्षाचालक रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. दिवस-रात्र मेहनत करून मिळणाऱ्या उत्पन्नातून घरखर्च, वाहनाचा देखभाल खर्च तसेच एलपीजी गॅसचा खर्च भागवावा लागतो. मात्र, सध्या नाशिक जिल्हा आणि अहिल्यानगर शहरातील ऑटो एलपीजीच्या दरामध्ये मोठी तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे.

नाशिक जिल्ह्यात ऑटो एलपीजीचा दर ५९.९४ रुपये, तर अहिल्यानगर शहरात ८४.४४ रुपये असल्याचे संघटनेने निवेदनात नमूद केले आहे. दोन्ही जिल्ह्यांमध्ये एवढी मोठी दरतफावत का आहे? नाशिकमध्ये वेगळा आणि अहिल्यानगरमध्ये वेगळा दर का आकारला जातो? एलपीजी गॅसचा दर निश्चित करण्यामागील नेमके कारण काय आहे? याची सखोल चौकशी करण्याची मागणी संघटनेने केली आहे. अहिल्यानगर शहरातील रिक्षाचालकांकडून जादा दर आकारला जात असल्यास त्याची जबाबदारी कोणाची, याची पुरवठा विभागाने तातडीने चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी ठाम मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. पंधरा दिवसांच्या आत निवेदनाची दखल घेऊन ऑटो एलपीजीच्या दरातील तफावत दूर करण्याबाबत योग्य कार्यवाही न झाल्यास, ३ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोठे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेने निवेदनाद्वारे दिला आहे.

# मध्यरात्री संशयितरीत्या फिरणाऱ्या दोघा जणांना पोलिसांनी पकडले

नगर - शहरातील इम्पेरियल चौकाजवळील जिल्हा परिषद प्रवेशद्वाराजवळ मध्यरात्री संशयितरीत्या फिरणाऱ्या दोन तरुणांना कोतवाली पोलिसांनी पाठलाग करून पकडले. याप्रकरणी पोलिसांनी दोघांविरुद्ध चोरीच्या उद्देशाने फिरत असल्याच्या संशयावरून गुन्हा दाखल केला आहे.

कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार अतुल काजळे आणि संकेत धीवर हे २० ऑगस्ट रोजी मध्यरात्री शहरात रात्रगस्त घालत होते. रात्री साडेबारा वाजेच्या सुमारास जिल्हा परिषद कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ अंधारात दोन तरुण संशयितरीत्या फिरताना दिसले. पोलिसांचे वाहन येताच हे दोघेही अंधाराचा फायदा घेऊन पळू लागले.

पोलिसांनी तत्परता दाखवत पाठलाग करून या दोघांना जागीच पकडले. पोलिसांनी त्यांची चौकशी केली असता त्यांनी आपली नावे प्रथमेश संतोष तरटे (वय १९, रा. घोगरगाव, ता. श्रीगोंदा) आणि किरण बापू दरेकर (वय १९, रा. कोयाळ पिंपळा, ता. आष्टी, जि. बीड) अशी सांगितली.

रात्रीच्या वेळी फिरण्याचे कारण विचारले असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे या दोघांनाही ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आले. याप्रकरणी पो.कॉ.अतुल काजळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संशयित आरोपी प्रथमेश तरटे आणि किरण दरेकर यांच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# तारकपूर बसस्थानकासमोर पान शॉपमध्ये गुटखा पकडला

### चौघांवर गुन्हा दाखल, मुद्देमाल जप्त

नगर - शहरातील तारकपूर बसस्थानका-समोरील 'ग्लोबल पानशॉप' वर पोलिसांनी छापा टाकून शासनाने बंदी घातलेला सुगंधी गुटखा आणि तंबाखू जप्त केला आहे. या कारवाईत एका आरोपीला रंगेहात पकडण्यात आले असून पुरवठा करणाऱ्या इतर तीन फरार आरोपींवर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार योगेश अशोक भिंगारदिवे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली. बसस्थानकासमोरील पानटपरीवर बंदी असलेला गुटखा विकला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून मुकुंदनगर येथील रहिवासी सद्दाम इसाक शेख (वय ३१, रा.इंडिया बेकरी जवळ, मुकुंदनगर) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून २ हजार ९४० रुपये किमतीचा विमल, रजनीगंधा पानमसाला तसेच बाबा आणि तुलसी तंबाखूच्या पुड्या असा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला.

तपासादरम्यान हा माल मुकुंदनगर येथील हसनेन शेख याच्यामार्फत शेवगाव येथील आत्तु उर्फ आदीबखान आय्युबखान पठाण आणि पाश्या उर्फ फिरदोसखान पठाण यांनी विक्रीसाठी पाठवल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी सद्दाम शेख, हसनेन शेख, आदीबखान पठाण आणि फिरदोसखान पठाण या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तिन्ही फरार आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

# आलमगीरमध्ये मावा बनवणाऱ्या अड्ड्यावर पोलिसांचा छापा; १ लाख ७५ हजारांचा मुद्देमाल केला जप्त

नगर - भिंगार परिसरातील आलमगीर भागात आरोग्यास घातक असलेला सुगंधित तंबाखू पासून मावा तयार करणाऱ्या अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी मावा बनवण्याचे यंत्र आणि प्रतिबंधित सुगंधित तंबाखूसह सुमारे १ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल प्रशांत राम राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, आलमगीर मशिदीच्या उत्तरेकडील रस्त्यालगतच्या एका खोलीत बेकायदेशीरपणे मावा तयार केला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी २० ऑगस्ट रोजी रात्री छापा टाकला. त्यावेळी आरोपी सलमान उर्फ सद्दाम हुसेन पठाण (वय २८, रा. आलमगीर, अहिल्यानगर) हा शरीरास अपायकारक असलेला मावा तयार करताना मिळून आला. या कारवाईदरम्यान पोलिसांनी ७० हजार रुपये किमतीचे मावा बनवण्याचे यंत्र, १७ किलो सुगंधित तंबाखू, ५० किलो तयार मावा आणि १२० किलो सुपारी असा एकूण १ लाख ७५ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. हा प्रतिबंधित सुगंधित तंबाखूचा साठा छत्रपती संभाजीनगर येथील संशयित आरोपी जितू मालपाणी उर्फ चांडक याने पुरवल्याचे तपासात समोर आले असून तो सध्या फरार आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाणे येथे आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक योगेश पवार पुढील तपास करत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### सकारात्मक विचार आणि दिवसाचे नियोजन

दिवसभरात उत्साह टिकवून `वण्यासाठी मनाची तयारी करणे आणि ।मांची योग्य आखणी करणे गरजेचे असते. सकाळी उठल्यानंतर मनामध्ये चांगल्या आणि कारात्मक विचारांना स्थान दिल्यास संपूर्ण दिवसाची दिशा ठरते. यासाठी सकाळी काही वेळ शांत बसून स्वतःशी संवाद साधणे, मनातील नकारात्मक विचार बाजूला सारणे आणि दिवसाची सुरुवात चांगल्या विचारांनी करणे फायदेशीर ठरते. यामुळे मनावरचा ताण हलका होतो आणि कामात मन लागते. सकारात्मक विचारसरणीसोबतच दिवसाचे योग्य नियोजन असणेही तितकेच आवश्यक आहे. सकाळी उठल्यावर आज दिवसभरात कोणकोणती महत्त्वाची कामे करायची आहेत, याची एक छोटी यादी मनात किंवा कागदावर तयार करावी. कोणत्या कामाला पहिले प्राधान्य द्यायचे हे ठरवल्यामुळे धावपळ होत नाही आणि अनावश्यक गोंधळ उडत नाही. कामाचे व्यवस्थित व्यवस्थापन केल्यामुळे ऊर्जा वाया जात नाही आणि प्रत्येक काम वेळेवर व योग्य प्रकारे पूर्ण होते. मन शांत आणि सकारात्मक असेल आणि कामाचे नियोजन पक्के असेल, तर दिवसभर नक्कीच टवटवीत आणि उत्साही वाटतो.

## पाककला

### कोल्हापुरी झणझणीत बेसन पिठलं (झुणका)

**साहित्य :** बेसन पीठ १ कप, मध्यम कांदा २ (बारीक चिरलेला), लसूण पाकळ्या ८-१० (ठेचलेल्या), हिरव्या मिरच्या ३-४ (बारीक चिरलेल्या), कढीपत्ता ८-१० पाने, मोहरी १/२ चमचा, जिरे १/२ चमचा, हिंग चिमूटभर, हळद १/२ चमचा, लाल तिखट २ चमचे, गरम मसाला १/२ चमचा, तेल ३-४ मोठे चमचे, बारीक चिरलेली कोथिंबीर अर्धी वाटी, मीठ चवीनुसार आणि पाणी दीड ते दोन कप.

**कृती :** एका मोठ्या बाऊलमध्ये बेसन पीठ घ्या. त्यात थोडे पाणी घालून पिठाची गाठी नसलेली गुळगुळीत आळवणी (पातळ मिश्रण) तयार करून बाजूला ठेवा. आता कढईत तेल गरम करून त्यात मोहरी, जिरे, हिंग आणि कढीपत्ता फोडणीस टाका. त्यानंतर त्यात ठेचलेला लसूण आणि हिरवी मिरची घालून थोडे परतून घ्या. नंतर बारीक चिरलेला कांदा घालून तो हलका गुलाबी रंगाचा होईपर्यंत चांगला परतून घ्या. कांदा परताल्यावर त्यात हळद, लाल तिखट आणि गरम मसाला घालून मसाले नीट मिक्स करा. या मसाल्यामध्ये दीड ते दोन कप पाणी ओतून चवीनुसार मीठ घाला आणि पाण्याला खमंग उकळी येऊ द्या. पाण्याला उकळी आल्यानंतर गॅस मंद करा आणि तयार केलेले बेसन पिठाचे पातळ मिश्रण ओतत एका हाताने सतत उलथणे किंवा रविने हलवत राहा, जेणेकरून पिठाच्या गाठी होणार नाहीत. सर्व पीठ चांगले मिक्स झाल्यानंतर कढईवर झाकण ठेवा आणि मंद आचेवर ३ ते ४ मिनिटे वाफ येऊ द्या. शेवटी वरून बारीक चिरलेली कोथिंबीर भुरभुरून गरमागरम झणझणीत पिठलं भाकरी किंवा चपातीसोबत सर्व्ह करा.

## वास्तू

### नेमप्लेट वरील अक्षरे

* नेमप्लेटवरील अक्षरे स्पष्ट आणि वाचायला सोपी असावीत. खूप मोठे किंवा खूप लहान फॉन्ट टाळावेत.

* अक्षरांचा रंग दरवाजाच्या रंगाशी सुसंगत असावा, पण तो वाचायला स्पष्ट असावा.

* नेमप्लेटवर कोणत्याही प्रकारचे प्राणी, राक्षस किंवा अस्वच्छ वाटतील अशी चित्रे नसावीत.

## सौंदर्य

दुधाची ताजी मलाई घेऊन त्यात चिमूटभर हळद मिसळा आणि ओठांवर हलक्या हाताने मसाज करा. यामुळे ओठ गुलाबी व म ऊ होतात. चेहऱ्यावरील काळे डाग, पिंपल्सचे व्रण आणि टॅनिंग घालवण्यासाठी बटाट्याचा रस अत्यंत गुणकारी आहे.

## सल्ला

बटाटे आणि कांदा एकत्र ठेवू नका. कांद्यामुळे बटाटे लवकर खराब होतात आणि त्यांना अंकुर फुटतात.

**संकलक : अ‍ॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, ज्येष्ठा १४।४९, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. २४ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** मन प्रसन्न राहील, कर्तृत्वाला उत्तम संधी मिळेल.

**वृषभ :** जिद्द व चिकाटी वाढेल, नातेवाईकांचे सहकार्य लाभेल.

**मिथुन :** दिलेले पैसे परत मिळतील, व्यवसायात प्रगती होईल.

**कर्क :** सर्व कामे सुरळीत पार पडतील, आरोग्य उत्तम राहील.

**सिंह :** महत्त्वाची कामे लांबणीवर पडण्याची शक्यता, मन अस्वस्थ राहील.

**कन्या :** अनेकांचे साहाय्य लाभेल, नवीन ओळखी होतील.

**तुळ :** आत्मविश्वास वाढेल, व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडेल.

**वृश्चिक :** शासकीय कामे मार्गी लागतील, ईश्वरी कृपा लाभेल.

**धनु :** वादविवाद टाळावेत, आध्यात्मिक आवड वाढेल.

**मकर :** स्वतःच्या मतावर दृढ राहाल, जोडीदाराचा सल्ला फायदेशीर ठरेल.

**कुंभ :** खर्च वाढेल, विरोधकांवर विजय मिळवाल.

**मीन :** व्यवसायातील अंदाज अचूक ठरतील, अपत्यसुख लाभेल.

## शब्दगंध क्र. ७४९९ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ■ | ३ | ४ | ५ |
| | ■ | | ■ | ■ | ■ | ६ | |
| | ■ | ७ | | ८ | ■ | | ■ |
| ९ | १० | | ■ | | ■ | ११ | १२ |
| ■ | १३ | | १४ | | १५ | ■ | |
| १६ | | ■ | | ■ | १७ | | |
| १८ | | | | ■ | ■ | ■ | |
| १९ | | ■ | २० | | | | |

**आडवे शब्द :-** १) दणकट; कणखर; बलशाली; शक्तिवान ३) सकाळनंतरचा भर उन्हाचा काळ ६) भक्कम; निश्चयी; निश्चित; पक्का ७) तिरस्कार; निषेध ९) पदार्थाचा उडालेला तुकडा ११) फसविणारा; लुच्चा १३) पेशव्यांचा ध्वज १६) वर्ष; साल; शक १७) जाणे; रवाना होणे १८) फाडणारे चिरणारे १९) धातूचा दोरा २०) रात्री फिरणारे (राक्षस, भूत वगैरे)

**उभे शब्द :-** १) रचना; नकली; घडण २) 'मॅजिस्ट्रेट'चे मराठी रूप ४) लगोलग; पाठीमागे लगेच जाणे ५) ऊस, फळ यातील द्रव ८) घोडा वगैरेवर बसून मारलेली फेरी १०) जड; पत असलेला; प्रतिष्ठित १२) आकाशात फिरणारे; पक्षी १४) स्त्रियांचे एक वस्त्र १५) एक पक्षी; वायस; काक; कावळा १६) भास्कर; रवि; सूर्य

### शब्दगंध क्र. ७४९८ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| म | ■ | वि | श्वा | स | ■ | दा | वा |
| स | म | ज | ■ | खा | स | दा | र |
| ण | ■ | न | गा | रा | ■ | सा | ■ |
| व | र | वा | ■ | म | ■ | हे | र |
| ट | ■ | स | ह | ■ | अ | ब | ब |
| ■ | चौ | ■ | र | स्ता | ■ | मा | ळ |
| ह | क | ना | क | ■ | मा | ळ | ■ |
| वा | स | ला | त | ■ | सा | के | त |

### फिल्मीचक्कर क्र. १२५० चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सं | जी | व | कु | मा | र | ■ | सा |
| ज | ■ | त | ■ | हे | ■ | प्रे | म |
| य | की | न | ■ | र | हे | मा | न |
| खा | ■ | के | ■ | ची | ■ | ना | ■ |
| र | या | ■ | प्या | सा | ■ | रा | म |
| ■ | रा | ■ | ■ | डी | ■ | य | ■ |
| अ | ना | मि | का | ■ | प्रा | ण | ■ |
| ब | ■ | ■ | ला | या | ■ | ■ | ■ |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** शब्द हे माणसाचे व्यक्तिमत्त्व घडवतात, त्यामुळे बोलताना नेहमी विचार करा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मानवाजवळ बुद्धिमत्ता असूनही तो पक्ष्यांप्रमाणे का उडू शकत नाही?

मानवाने आपल्या प्रखर बुद्धिमत्तेच्या जोरावर पृथ्वीवरील सर्वजीवांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. समुद्राच्या गहिऱ्या पाण्यापासून ते अंतराळातील अथांग पोकळीपर्यंत आणि चंद्राच्या भूमीपासून मंगळापर्यंत मानवाने आपल्या पाऊलखुणा उमटवल्या आहेत. विज्ञानाच्या प्रगतीमुळे आज मानवाने आकाशात झेप घेतली आहे, परंतु निसर्गाच्या नियमांनुसार मानवाला स्वतःच्या शारीरिक बळावर पक्ष्यांप्रमाणे मुक्तपणे आकाशात उडता येत नाही. यामागे अनेक वैज्ञानिक, शारीरिक आणि जैविक कारणे आहेत, जी मानवी शरीररचना आणि पक्ष्यांच्या शरीररचना यांच्यातील मूलभूत फरकांवर आधारित आहेत.

सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे मानवी शरीराचे वजन आणि वस्तुमान. मानवाचे शरीर जड, घट्ट आणि मांसल असते. आपल्या शरीराची हाडे पोकळ नसून ती मजबूत आणि भारी असतात, जी जमिनीवर उभे राहण्यासाठी आणि चालण्यासाठी आवश्यक असतात. याउलट, निसर्गाने पक्ष्यांची रचना उड्डाणासाठीच केलेली असते. पक्ष्यांची हाडे आतून पोकळ असतात आणि त्यात हवा भरलेली असते, ज्यामुळे त्यांचे संपूर्ण शरीर अतिशय हलके बनते. हे हलके वजनच त्यांना हवेत सहजतेने तरंगण्यास मदत करते. मानवाचे वजन त्याच्या शरीराच्या आकारमानाच्या मानाने खूप जास्त असते, ज्यामुळे गुरुत्वाकर्षण बल मानवाला सतत जमिनीकडे खेचून ठेवते. दुसरे मोठे कारण म्हणजे स्नायूंची ताकद आणि रचना. पक्ष्यांचे छातीचे स्नायू प्रचंड ताकदवान असतात, जे त्यांना आपले पंख सतत वेगाने आणि ताकदीने हलवण्यास मदत करतात. पक्ष्यांचे पंख हे त्यांच्या शरीराचाच एक भाग असतात आणि त्यांच्या हालचाली नियंत्रित करण्यासाठी त्यांच्याकडे विशिष्ट मज्जासंस्था असते. मानवाचा विचार केला तर, मानवाला पक्ष्यांसारखे पंख नसतात. जर मानवाने कृत्रिम पंख पाठीला किंवा हाताला बांधले आणि स्वतःच्या हातांच्या स्नायूंच्या बळावर ते हलवण्याचा प्रयत्न केला, तर मानवी हाताचे स्नायू इतके कमकुवत असतात की ते स्वतःच्या शरीराचे वजन हवेत उचलण्यासाठी आवश्यक ती ताकद निर्माण करू शकत नाहीत. मानवाचे स्नायू हे ओझे उचलण्यासाठी किंवा चालण्यासाठी बनले आहेत, पंख हलवून हजारो फूट उंचीवर उडण्यासाठी नाहीत.

तिसरे आणि अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे शरीराचा आकार आणि हवेचा प्रवाह कापण्याची क्षमता. पक्ष्यांची शरीररचना ही हवेचा विरोध कमी करणारी असते. जेव्हा पक्षी हवेत उडतात, तेव्हा त्यांचा आकार हवेची दिशा बदलून त्यांना सहजतेने पुढे जाण्यास मदत करतो. त्यांची पिसे केवळ उबड ठेवण्यासाठी नसतात, तर ती हवेचा प्रवाह नियंत्रित करण्याचे काम करतात. मानवाचा आकार असा एरोडायनामिक नसतो. मानवाचे शरीर चौकोनी आणि अवजड असते, ज्यामुळे हवेत गेल्यास हवेचा प्रचंड विरोध सहन करावा लागतो आणि शरीराचे संतुलन बिघडते.

हे सर्व असूनही मानवाने हार मानलेली नाही. मानवाने आपल्या बुद्धिमत्तेचा वापर करून पक्ष्यांप्रमाणे स्वतः उडण्याऐवजी, विमाने, हेलिकॉप्टर्स, ग्लायडर्स आणि पॅराशूट्स यांसारख्या अत्याधुनिक यंत्रांची निर्मिती केली. विमानांचे वजन आणि आकार जरी मानवापेक्षा कैक पटीने जास्त असला, तरी इंजिनाची प्रचंड ताकद, पंखांची विशेष रचना आणि हवेचा दाब यावर भौतिकशास्त्राच्या नियमांचा वापर करून मानवाने पक्ष्यांपेक्षाही उंच आणि वेगाने आकाशात प्रवास करणे शक्य केले आहे.

थोडक्यात सांगायचे तर, निसर्गाने मानवाला पक्ष्यांप्रमाणे उडणारे शरीर किंवा जैविक यंत्रणा दिलेली नाही. शरीराचे अधिक वजन, जड हाडे, कमकुवत स्नायू आणि गुरुत्वाकर्षण यामुळे मानवाचे शरीर स्वतःच्या ताकदीने उडू शकत नाही. परंतु मानवाची बुद्धिमत्ता ही त्याच्या शारीरिक मर्यादांपेक्षा कैक पटीने मोठी आहे, आणि याच बुद्धिमत्तेच्या बळावर आज मानवाने आकाशावर आपले आधिपत्य गाजवले आहे.

## रेषेची जादू

एका मोठ्या चित्रकलेच्या वर्गात एक प्रख्यात चित्रकार विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी आले होते. त्यांनी वर्गात प्रवेश केला आणि फळ्यावर खडूने एक लांब सरळ रेषा काढली. रेषा काढल्यानंतर त्यांनी सर्व विद्यार्थ्यांकडे पाहिले आणि विचारले, मुलांनो, मी ही जी फळ्यावर रेषा काढली आहे, ती न पुसता किंवा तिला न हात लावता, मला ही रेषा आकाराने लहान करून दाखवा. तुमच्यापैकी कोणाला हे जमेल का?

वर्ग काही वेळ शांत झाला. सर्व विद्यार्थी विचार करू लागले. एक रेषा न पुसता ती लहान कशी करता येईल? हा अशक्य प्रश्न आहे, असे सगळ्यांना वाटले. काही वेळाने एका हुशार विद्यार्थ्याने हात वर केला आणि तो फळ्यावर गेला. त्याने काय केले? त्याने त्या पहिल्या रेषेच्या खाली त्याच्यापेक्षा एक मोठी दुसरी रेषा ओढली.

हिली रेषा अजिबात न पुसता, दुसऱ्या मोठ्या रेषेच्या तुलनेत पहिली रेषा आता आपोआपच लहान दिसत होती! प्रख्यात चित्रकार हसले आणि म्हणाले, शाब्बास! हेच आपल्या आयुष्याचे सत्य आहे.

बोध : आपण बऱ्याचदा इतरांच्या यशाकडे, प्रगतीकडे किंवा गुणांकडे पाहून स्वतःला कमी लेखतो, हताश होतो किंवा इतरांना खाली खेचण्याचा प्रयत्न करतो. परंतु, स्पर्धा ही इतरांना पाडण्यात नाही, तर स्वतः चे कर्तृत्व आणि यश इतके मोठे करण्यात आहे, की आपोआप इतरांच्या तुलनेत आपण पुढे जाऊ. जर तुम्हाला मोठे व्हायचे असेल, तर कोणाचे पाय ओढण्यापेक्षा आपली स्वतःची 'मोठी रेषा' (स्वतः ची मेहनत आणि प्रगती) ओढा!



## आत्मशक्ति

### आत्मानंद

म्हटले आहे नानक दुखिया सब संसार ।जेव्हा आमचे मन आणि शरीर आमचा आत्मा झाकाळतात तेव्हा आम्ही अंतरातील दिव्य आनंदापासून दूर होतो. आम्ही आमच्या खऱ्या सुखाच्या अवस्थेपासून अनभिज्ञ आहोत. आमच्या व्याधी आणि दुःखाचे कारण हे आहे की, आम्ही स्वतःला शरीर समजतो आणि इंद्रियांच्या घाटावरच त्यांच्या निर्देशानुसार जीवन जगत असतो. हे जणू एखाद्याने स्वप्नात असल्यासारखेच असून ह्या जगातली प्रत्येक गोष्ट आम्हाला खरी वाटू लागते. जोपर्यंत आम्ही ह्या स्वप्नातून बाहेर पडत नाही, तोपर्यंत आम्ही स्वतःला हे शरीरच समजतो.आमचा आत्मा एका कथेतील झोपी गेलेल्या राजकन्येसारखा आहे.

ह्या कथेत सांगितले आहे की, जोपर्यंत एखादा सुंदर राजकुमार ह्या झोपी गेलेल्या राजकुमारीचे चुंबन घेऊन तिला जागे करीत नाही तोपर्यंत ती झोपलेलीच असते. आम्ही अशाच प्रकारे झोपी गेलो आहोत. आम्हाला या स्वप्नातून बाहेर पडावयास हवे आणि आत्म्याचे वास्तव स्वरूप ओळखावयास हवे.

आम्ही जोपर्यंत शरीर, मन आणि इंद्रियांच्या स्तरावरून वर येत नाही आणि आपल्या आत्मिक स्तरावरून जीवन जगणे सुरू करीत नाही तोपर्यंत परमानंद प्राप्त करू शकत नाही. परमानंदाची स्थिती मिळवायची तर बाह्य जगापासून आमचे ध्यान दूर व्हायला पाहिजे, तेव्हाच आम्ही दुःख आणि वेदनेपासून मुक्त होऊ ! आत्मा ज्या आनंदाचा अनुभव घेतो तो या जगातील अनुभवापेक्षा वेगळा आहे म्हणूनच ज्या संतमहात्म्यांनी ह्या आनंदाचा अनुभव घेतला आहे. त्यांना ती स्थिती समजावून देण्यासाठी उपमा व अलंकाराचे सह्य घ्यावे लागते. त्यांनी अंतःकरणातील आनंदाच्या धुंदीची तुलना विवाहाशी केलेली आहे.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### मुलांचे पालन प्रेमाने करा

सुरेश ओबेरॉय : अध्यात्म शाळेत शिकवलं जात नाही. बाळ जेव्हा आईच्या उदरात असतं तोच त्याच्यासाठी शिकण्याचा सर्वात महत्वाचा कालावधी असतो, हे तुम्ही खूप छान समजावून सांगितलं. या काळात पालक त्यांना पाहिजे ते मुलांना शिकवू शकतात.

शिवानीदीदी : या काळात ते बाळाला ज्या गोष्टी सांगितल्या जातात त्या सगळ्या गोष्टी बाळ आत्मसात करतं. बाळाला मूल्यं शिकवण्याचा तो योग्य काळ आहे. बाळ ऐकत नाहीये असा विचार कधीच करू नका. ते आईवडिलांचं सगळं बोलणं ऐकतं आणि त्यांची स्पंदनं शोभून घेतं, ग्रहण करतं.

सुरेश ओबेरॉय : मागच्या भागात तुम्ही 'प्राधान्य' हा शब्द वापरला. 'मी प्रेम आहे आणि हेच आपलं प्रथम प्राधान्य आहे' याचं आपण स्मरण ठेवलं तर आयुष्यातील कोणत्याही परिस्थितीत आपण तसेच राहू.

शिवानीदीदी : याचा आपल्या जीवनातील आरोग्य, समृद्धी, कल्याण अशा प्रत्येक पैलूवर परिणाम होईल. म्हणूनच आपलं प्राधान्य कशाला आहे हे लक्षात ठेवण्याची गरज आहे. आपलं आरोग्य उत्तम असणं आणि आपण आनंदी असणं याचा प्रभाव आपल्या मुलांवर पडतो, या बाबत आपण पूर्वी चर्चा केली आहे. जेव्हा कुटुंबात नवीन आत्मा येणार असतो तेव्हा पालक त्यांच्या इंद्रियांमधून जे काही स्वीकारतील - जसं, ते जे बघतील, वाचतील, ऐकतील, खातील त्याचबरोबर जे अनुभवतील - त्या सगळ्याचा आईच्या उदरात आकारास येणाऱ्या जिवावर थेट परिणाम होतो.

सुरेश ओबेरॉय : जर पालकांनी ते प्रेमस्वरूप आहेत असा विचार केला तर ते त्यांच्या बाळाला जास्तीतजास्त आनंद देऊ शकतात. आणि हेच त्यांना पाहिजे असतं. पण नेहमीच ते इतकं सरळ नसतं कारण एक मोठं संयुक्त कुटुंब असतं आणि परस्परांतील संबंध गुंतागुंतीचे असू शकतात.

शिवानीदी : आपल्या कुटुंबात जन्म घेणाऱ्या आत्म्याचं घरातल्या प्रत्येक सदस्याबरोबर एक कार्मिक खातं असतं, हे आपण लक्षात घेतलं पाहिजे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : सांग पाहू, 'धैर्य' म्हणजे नेमकं काय?
विद्यार्थी : सर, लग्नानंतरही नवऱ्याने बायकोला हे सांगणं की,
अगं, या साडीमध्ये तू एकदम अप्सरा दिसतेस!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* संयुक्त राष्ट्रांची स्थापना कधी झाली?
- २४ ऑक्टोबर १९४५ (मुख्य कार्यालय न्यूयॉर्क, अमेरिका)

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### मका

२) मक्याच्या गोडसर चवीमुळे त्याला 'स्वीट कॉर्न' असेही म्हणतात. इतर सर्व धान्यांपेक्षा मक्यामध्ये नैसर्गिक शर्करा जास्त प्रमाण असते.

३) मलावष्टंभाचा त्रास असणाऱ्यांनी मक्याचे दाणे वाफवून खाल्ले असता त्याच्या सारक गुणधर्मामुळे आतड्यांची हालचाल वाढून शौचास साफ होते.

४) वाळलेल्या मक्याच्या दाण्याच्या उत्कृष्ट लाह्या बनतात. यालाच 'पॉपकॉर्न' असे म्हणतात. लाह्या करताना त्यातील कांजी जळून जाते. त्या खाल्ल्याने वजनामध्ये वाढ होत नाही.

५) स्थूल व्यक्तींना वजन कमी करायचे असेल, तर पॉपकॉर्न खावेत. यामुळे भूक शमली जाऊन वजन कमी होते.

६) मक्याच्या पिठापासून भाकरी बनविली जाते. ही भाकरी स्वादिष्ट असून, शरीरास पौष्टिक असते व खाल्ल्यानंतर ती सहजच पचते.

७) मका दळून त्याचे पीठ बनवून ठेवावे. या पिठापासून रोटी, भाकरी, थालीपीठ, ढोकळे, वडे असे पदार्थ बनवावे. फक्त भाकरी व रोटी खाताना मक्याच्या रूक्ष गुणाचा त्रास होऊ नये म्हणून त्यावर साजूक तूप टाकावे.

८) मक्याच्या दाण्यांपासून सूप, सॅलड, भेळ, कोशिंबीर, मक्याचा चिवडा, वडे, उसळ असे विविध पदार्थ बनतात.

९) पळसाच्या पानावर मक्याच्या पिठापासून बनविलेली भाकरी अत्यंत गोड, स्वादिष्ट व पौष्टिक असते. या भाकरीलाच 'पानगी' असे म्हणतात. पंजाबमध्ये अनेक ठिकाणी मक्यापासून भाकरी बनविली जाते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# जिल्हा वाचनालयाच्या निबंध व चित्रकला स्पर्धेत धिरडे, शिंदे, अमृते, बिडकर, बोल्ली यांनी पटकावला प्रथम क्रमांक


जिल्हा वाचनालयाच्यावतीने आयोजित निबंध व चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांचा पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

नगर – अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने आयोजित लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त निबंध स्पर्धा, स्वातंत्र्यदिनानिमित्त घेतलेल्या चित्रकला स्पर्धेत विविध गटात सुमन धिरडे, आर्या शिंदे, भार्गवी अमृते, रुद्राक्ष बिडकर, स्वरा बोल्ली यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

विजेत्यांना उद्योजक रवींद्र मुळे, वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र ठाकूर, उपाध्यक्ष दिलीप पांढरे, सहकार्यवाह राहुल तांबोळी, संचालक किरण आगरवाल, शिल्पा रसाळ, प्रा. ज्योती कुलकर्णी, ग्रंथपाल अमोल इथापे, परीक्षक स्वाती रानडे, डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे, चित्रकला स्पर्धेचे परीक्षक प्रशांत शेकटकर, प्रवीण साळुंखे यांच्या उपस्थितीत विविध पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना उद्योजक मुळे म्हणाले, ज्या काळात जगाला वाचन, लिखाण, लिपी या गोष्टी अज्ञात होत्या, त्या काळात आपल्या ऋषीमुनींनी ग्रंथांच्या माध्यमातून अजरामर असे साहित्य निर्माण केले. आम्ही या दैवित्यमान संस्कृतीचे पाईक आहोत याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान असायला हवा. आपल्या देशात क्रांती करणारे अनेक महापुरुष हे वाचनातून, साहित्यातून घडले. आपली सुप्त मनशक्ती, कल्पनाशक्ती आणि खऱ्या अर्थाने समृद्ध जीवनाची कला ही वाचनातून निर्माण होते, असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात डॉ. राजेंद्र ठाकूर यांनी अहिल्यानगर जिल्हा वाचनालय वाचन संस्कृती वाढवणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देऊन स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना एक वर्षाचे मोफत सभासदत्व देणार असल्याचे जाहीर केले.

निबंध स्पर्धेच्या परीक्षका स्वाती रानडे आणि चित्रकला स्पर्धेचे परीक्षक प्रवीण साळुंखे यांनी स्पर्धे विषयी उपस्थित विद्यार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन संचालिका शिल्पा रसाळ यांनी केले. स्वागत प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी केले. आभार किरण आगरवाल यांनी मानले. स्पर्धेसाठी वाचनालयाचे सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल, वर्षा जोशी, संजय गाडेकर, आतिष तरोटे, सिकंदर शेख आदींचे बहुमूल्य सहकार्य लाभले.

स्पर्धेतील विजेते खालील प्रमाणे – निबंध स्पर्धा खुला गट – प्रथम क्रमांक– सुमन प्रभाकर धिरडे, द्वितीय क्रमांक – समृद्धी प्रकाश थोरात, तृतीय क्रमांक– तेजल दादासाहेब शिंदे, उत्तेजनार्थ : वेदिका सुरज जाधव, अपूर्वा प्रकाश देसाई, ईश्वरी जालंधर पावसे, जयश्री लक्ष्मण पोपळघट, शुभम शंकरराव पाटील. शालेय गट – प्रथम क्रमांक – आर्या मोहन शिंदे, द्वितीय क्रमांक –(विभागून) तन्मय जालिंदर पडोळे, द्वितीय क्रमांक विभागून – शुभंकर सागर माळवदे, तृतीय क्रमांक विभागून – अस्मि अमोल सप्तर्षी, तृतीय क्रमांक विभागून – स्वरा विजय टाकसाळे, उत्तेजनार्थ हर्षदा बालाजी जाधव, सिद्धी ज्ञानेश देव, अनुष्का सोमनाथ चौधरी, काव्या दिलीप कोठवळ, सेजाम ज्ञानदेव दळवी, ओवी लक्ष्मण जायभाये, आर्या सुरज जाधव.

चित्रकला स्पर्धा – गट क्रमांक– १ इयत्ता पहिली ते २री– भार्गवी विशाल अमृते – प्रथम क्रमांक, आन्वी बाळासाहेब मेहेत्रे – द्वितीय क्रमांक, कनिष्का सचिन बोरुडे – तृतीय क्रमांक, उत्तेजनार्थ : मनस्वी अनुराग पडोळे, वेदिका प्रशांत काळे, सिफान आसिफ शेख, ओवी विशाल फणसे, गिरीजा राजेंद्र ढेरे. गट क्रमांक २– इयत्ता ३ री ते ४थी – प्रथम क्रमांक –रुद्राक्ष दिपक बिडकर, द्वितीय क्रमांक – अभिनंदिनी शरद राऊत, तृतीय क्रमांक – संमय निलेश कटके, उत्तेजनार्थ – गौरी गणेश मोरे, रुही गौरव पेटकर, मनश्री मनोहर गोभे, सुयोग सचिन सुंबे, हर्षा राहुल कांडके. गट क्रमांक तीन – इयत्ता ५वी ते ७ वी – प्रथम क्रमांक– स्वरा रमेश बोल्ली, द्वितीय क्रमांक – जान्हवी कन्हैयालाल तारळकर, तृतीय क्रमांक – सान्वी नंदू लोणकर, उत्तेजनार्थ – अन्वी शिवाजी गोफणे, आरव संदिप पवार, तेजस किशोर हराळ, आराध्या प्रमोद शेकडे, वैष्णवी बाळासाहेब यादव.

# प्रेरणादायी अक्षरधन

## सद्सद्विवेकबुद्धी हाच सद्गुरू

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स




एकदा एक जंगली हिरवट माशी दारातून खोलीत शिरली. उन्मत आवाज करीत गलीभर हिंडली. उद्धटासारखी कुणाच्या कानाशी लाग, तर कुणाच्या डोक्यावर बैस, चाळे करु लागली. मग तिला हाकलावे लागले. तेव्हा ती घाबरली. बाहेर जायचा प्रयत्न करु लागली. खिडकीशी गेली. खिडकीला काचेची तावदाने होती. प्रकाश आत येत होता. पण आतून कुणालाही बाहेर येणे शक्य नव्हते. ती माशी सारखी काचेवर डोके आपटायची. पण मुक्ती मिळत नव्हती. संकटातून बाहेर पडता येत नव्हते. आकलणाऱ्याचा मार मुकाटपणे सोसावा लागत होता. मला एक बडबडगीत आठवले,

अगं अगं माशी, दारातून येशी
दादाशी गाठ पडली खाशी

मग दादाचा मार खाशी बाहेर जायला तडफडशी काचेवर डोकं आपटशी, पण अशी बाहेर जाशील कशी ?

उगाच काचेवर डोकं आपटून घेशी ?
कशाला ग नाहक मरशी ?
दारातून आली, दारातूनच जाशी

पण माशीला अज्ञानापायी मुक्तीचे दार सापडत नाही. माणसा, तुही माशीसारखाच. दुःखाचे, दैन्याचे दारिद्याचे तडाखे खात, अज्ञानापायी, काचेवर डोके, आपटून घेतो आहेस. मुक्तीचे द्वार का शोधत नाहीस? हटासारखा वागतोस ? याला चाव, त्याला मार. अरे त्यात तुझीच होणार हार. आवर यांना. घालव दूर वासनांना. प्राणिमात्रांवर कर.

देवा, माझ्यातील अहंकारापायी येणारा उद्धटपणा घालव. माझ्या मनावर अंकुश असू दे. वासना शमू दे. प्राणिमात्रावरील दया वाढीला लाव. दुःख दूर कर.

खोलीत शिरलेल्या हिरवट माशीला कुणी तरी हळूहळू सरकवत दाराकडे नेले. वाट सापडली. माशी दुःखातून सुटली. पण मुक्तीचे दार दाखवायला हवा ना कुणी? तो असतो सद्गुरु

म्हणे मुक्ताबाई,
सद्गुरु वाट द्या मजला ।
हाता हात दिला साधनाचा ।।

बा माणसा. आपली सद्सद्विवेकबुद्धी हाच सद्गुरु आहे. शरीर व मन स्वच्छ ठेवणे, मग आचार व विचार शुभंकर होणे, हेच सद्गुरुचे वाट दाखविणे, सकळ सारासार विचारु, हाच सद्गुरु, दाखवी सद्वस्तु, असे समर्थ रामदास म्हणतात. मन विशाल हृद्यात, विश्वकल्याणाच्या संकल्पना निर्धारित होतात. या आनंदभवुवनी प्राणिमात्र सकलानंदी होतात. शेख सादी सांगतात एका सुलतानाने कुण्या एकाला फाशीची शिक्षा सुनावली. तो कुणी एक मग वजिराकडे गेला. मला सोडव म्हणाला. वजिराने त्याच्या कानात काही सांगितले आणि त्याचे फाशीचे पाश सुटले. विवेकाने काम केले.

असे काय घडले? फाशीवर जाण्याची वेळ आली तेव्हा सुलतानाने त्याला अल्लाचे स्मरण करायला सागितले. तेव्हा तो कुणी एक म्हणाला, तुम्हीच माझे अल्ला. म्हणून मी तुमचचं स्मरण करतोय. सुलतान सद्गुणी आहे. सुलतान दयाळू आहे. आणि सुलतान गहिवरला. गळ्याभोवतीचा फास सुटला.

**– किशोर गांधी**

# 'सद्गुरू श्री साहेबराव आवारे साहित्य पुरस्कार–२०२६'साठी मुदतवाढ

नगर – अक्षर साहित्य प्रतिष्ठान, अहिल्यानगर यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'सद्गुरू श्री साहेबराव आवारे साहित्य पुरस्कार–२०२६' साठी पुस्तक पाठविण्याचे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष सिद्धिनाथ मेटे महाराज यांनी केले आहे. साहित्यिकांना आता ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत पुरस्कारासाठी पुस्तके पाठविता येतील.

या पुरस्कारासाठी कादंबरी, काव्यसंग्रह तसेच कथासंग्रह, चरित्र, आत्मचरित्र, वैचारिक लेखन, नाटक, बालसाहित्य, संशोधन आदी इतर साहित्य प्रकारांतील पुस्तके स्वीकारण्यात येणार आहेत. कादंबरी, काव्य आणि इतर प्रत्येक अशा तीन साहित्यकृतीस पुरस्कार देण्यात येतील. हें साहित्य दोन प्रती पाठविणे आवश्यक आहे.

सन्मानचिन्ह व प्रत्येकी रोख ५ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कारासाठी इच्छुक साहित्यिकांनी आपली पुस्तके समन्वयक सार्थक वाळके पाटील, न्यू तिरंगा प्रिंटर्स, शॉप नं. १, छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुल, तानवडे लॅबजवळ, बागरोजा हडको, दिल्लीगेट रोड, नालेगाव, अहिल्यानगर – ४१४००१ या पत्त्यावर पाठवावीत. पुरस्कार वितरण सोहळा २९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता जेऊर (ता. नगर) येथे आयोजित करण्यात आला आहे.

अधिकाधिक साहित्यिकांनी या पुरस्कारासाठी आपल्या साहित्यकृती पाठवाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# संस्कृती कनोरे प्रशालेतील स्कॉलरशिप विजेत्या ४ विद्यार्थ्यांना सायकल भेट


संस्कृती कनोरे प्रशालेतील शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झालेल्या ४ विद्यार्थ्यांना सायकली भेट देताना कृष्णा बागडे व मान्यवर.

नगर – कल्याण रोड येथील संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेत स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झालेल्या ४ विद्यार्थ्यांना स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे माजी खजिनदार कृष्णा बागडे यांच्या हस्तेसायकली भेट देण्यात आल्या. यामध्ये मुलिका गवळी, वैष्णवी कवडे,पल्लवी चाबुकस्वार, चिन्मय गवते यांचा समावेश आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना कृष्णा बागडे म्हणाले, संस्कृती श्रीनिवास कनोरे विद्यालयाची प्रगती कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून आई–वडील व शाळेचे नाव उज्वल करावे.

या प्रसंगी शालेय शिक्षण समितीचे चेअरमन जितेंद्र लांडगे, व्हाईस चेअरमन सौ.मृणालताई कनोरे, संस्थेचे खजिनदार गजेंद्र सोनवणे, शिक्षण समितीचे सचिव संजय सागांवकर, स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, सचिन मडके, चंद्रकांत मानकर, किरण डफळ, प्रसाद कांबळे, योगेश पांढरपोटे, राकेश गवते, निलेश मिसाळ, नीरज चांगटे यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना भामरे, बबनभाई शेख, राजेंद्र गर्जे, सुशीलकुमार आंधळे, चंदा कार्ले, वैशाली केदारे, सुरेखा कर्डिले, राणी पवार, अनिता जपकर, विद्या नरसाळे आदींनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन चंदा कार्ले यांनी केले तर आभार राजेंद्र गर्जे यांनी मानले.

# नालेगावच्या लाल मातीत माऊली कोकाटेंची विजयी कुस्ती

## पंढरपूरच्या माऊली जमदाडेला चितपट करत पटकावली मानाची गदा


नालेगावच्या कुस्ती मैदानात मानाची कुस्ती जिंकलेल्या सोलापूरच्या माऊली कोकाटेला चांदीची गदा देताना आ. संग्राम जगताप व इतर.

नगर – शहरातील सीना नदीकाठी असलेल्या श्री वारुळाचा मारुती मंदिर परिसरात नागपंचमीनिमित्त भरलेल्या यात्रेच्या उत्साहात भव्य कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले. आ. संग्राम जगताप यांच्या सहकार्याने हिंदुत्व प्रतिष्ठान व नालेगाव ग्रामस्थांच्या वतीने, नगरसेवक पै. महेश लोंढे यांच्या पुढाकारातून झालेल्या या कुस्ती मैदानात राज्यभरातील नामवंत मल्लांनी सहभाग घेत लाल मातीच्या आखाड्यात आपल्या कुस्ती कौशल्याचे दर्शन घडविले. मुख्य कुस्तीत सोलापूरच्या माऊली कोकाटेने पंढरपूरच्या माऊली जमदाडेला चितपट करत विजय मिळविला.

कोकाटेने केलेल्या दमदार डावाने नालेगावचा आखाडा टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेला. कुस्तीप्रेमींनी विजयी मल्लाचे उत्स्फूर्त स्वागत करत त्याच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. विजयी मल्लाला मानाची चांदीची गदा आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते देण्यात आली. नालेगाव परिसराला कुस्तीची समृद्ध परंपरा लाभली असून, या परंपरेला पुढे नेत नवोदित मल्लांना प्रोत्साहन मिळावे, त्यांना मोठ्या आखाड्याचा अनुभव मिळावा आणि कुस्तीची संस्कृती जपली जावी, या उद्देशाने यंदाही भव्य कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले.

आखाड्यात लहान–मोठ्या मल्लांच्या अनेक कुस्त्या रंगल्या. प्रत्येक कुस्तीमध्ये मल्लांनी आपल्या ताकदीसोबतच डावपेच, चपळाई आणि तंत्रशुद्ध कुस्तीचे प्रदर्शन केले. त्यामुळे मैदानावर उपस्थित असलेल्या प्रेक्षकांमध्ये प्रत्येक कुस्तीबद्दल उत्सुकता निर्माण झाली होती. मैदानातील विजयी मल्लांवर आयोजक आणि कुस्तीप्रेमींकडून बक्षिसांचा वर्षाव करण्यात आला. विजयी मल्लांना रोख स्वरूपात बक्षिसे देण्यात आली. उपविजयी मल्लांचाही रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. अनेक प्रेक्षकांनी विजयी मल्लांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांना रोख रकमेची बक्षिसे दिली. यावेळी ज्येष्ठ पैलवान तथा वस्ताद मारुती खंडागळे यांचा ग्रामस्थांच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. मैदानात पंच म्हणून पै. संभाजी लोंढे, उपमहाराष्ट्र केसरी पै. अनिल गुंजाळ, पै. अर्जुन शेळके, पै. बंडू शेळके, पै. सारंग वाघ, पै. युवराज करंजुले, पै. अजय म्हस्के आणि पै. दादा पांडूळे यांनी काम पाहिले.

मैदानाचे प्रभावी सूत्रसंचालन पै. हांगेश्वर धायगुडे यांनी केले.

कुस्ती मैदान यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आयोजक अशोक घोडके, पै. सुनिल कदम, पै. मिलिंद जपे, बाळासाहेब भापकर, दत्ता ठाणगे, विजय शिंदे, पै. मयुर जपे, पै. आकाश घोडके, पै. ओम खंडागळे, पै. शुभम लोंढे, बबन रोहोकले, शिवाजी कदम, गणेश शेठ साळुंके तसेच हिंदुत्व प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# गावठी कट्टा विक्रीसाठी आलेल्या तरुणाला पोलिसांनी पकडले



नगर – गावठी कट्टा विक्री साठी आलेल्या एका तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कट्टा व २ जिवंत काडतुसांसह पकडले असून त्याचा गावठी कट्टा विक्रीचा प्रयत्न उधळला आहे. अनिल सिताराम सावंत (वय ३०, रा.ब्राम्हणी, ता.राहुरी) असे या आरोपीचे नाव आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिलेल्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. संतोष मुटकुळे यांनी उपनिरीक्षक संदिप दरवडे व पोलीस अंमलदार अरूण गांगुर्डे, अशोक लिपणे, भगवान सानप, किशोर शिरसाठ, प्रशांत राठोड व महादेव भांड अशांचे पथक तयार करुन अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये अवैध शस्त्रे बाळगणारे इसमांची माहिती काढुन कारवाई करणेबाबत पथकास सुचना व मार्गदर्शन करुन रवाना केले.

सदर पथक २० ऑगस्ट रोजी शनिशिंगणापूर पोलीस ठाणे हद्दीमध्ये पेट्रोलिंग करत असताना त्यांना अनिल सावंत, याचेजवळ गावठी कट्टा असून तो त्याची विक्री करण्यासाठी हॉटेल ब्लू ऑरगॅनिक रसवंती सेंटर जवळ, शनिशिंगणापूर येथे आला असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीवरून पथकाने नमूद ठिकाणी जाऊन संशयीताचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचेकडे एक गावठी कट्टा व २ जिवंत काडतुस आढळून आले. पोलिसांनी ते जप्त केले. त्याच्या कडे अधिक चौकशी केल्यावर त्याने गावठी कट्टा व जिवंत काडतूस हे गणेश शहाराम शिंदे (रा. वळणपिंप्री, ता.राहुरी) याचेकडून विकत घेतले असल्याची माहिती सांगीतली. या आरोपी विरुद्ध शनिशिंगणापूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


सेंट विवेकानंदच्या विद्यार्थ्यांनी नगरच्या 'सायबर शाखे'ला भेट दिली त्यावेळी उपस्थित अधिकारी.

# सेंट विवेकानंदच्या विद्यार्थ्यांनी दिली 'सायबर शाखे'ला भेट

नगर – येथील सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी क्षेत्रीय भेट 'सायबर गुन्हे शाखा' येथे दिली. विद्यार्थ्यांना वेबसाईट हॅकिंग, सायबर स्टॉकिंग, सायबर पोर्नोग्राफी, ईमेल क्रेडिट कार्ड गुन्हे, सॉफ्टवेअर पायरसी, ऑनलाइन फसवणूक आणि इंटरनेट गुन्ह्यांच्या तपासात सायबर शाखा कशी सहभागी होते याची माहिती करून देण्यात आली.

विद्यार्थी तसेच शिक्षकांसाठी हे एक माहितीपूर्ण सत्र होते. सायबर क्राईमचे पो.नि. सागर ढिकले व उपनिरीक्षक सुदाम काकडे यांनी विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. काश्वी परदेशी व अद्वय धायतडक या विद्यार्थ्यांनी सायबर गुन्ह्यांची माहिती दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

शाळेच्या प्राचार्या गीता तांबे यानी पुढाकार घेऊन क्षेत्रभेट आयोजित केली व विद्यार्थ्यांना वास्तविक जगाचा संदर्भ मिळाला, ज्यामुळे पाठ्यपुस्तकातील अमूर्त संकल्पना अविस्मरणीय आणि प्रत्यक्ष अनुभवातून शिकता आल्या. विद्यार्थ्यांसमवेत संस्थेचे खजिनदार दामोदर माखिजा, विद्यालयाच्या प्राचार्या गीता तांबे, वरिष्ठ शिक्षक सीमा कोटस्थाने, शिरीन शेख, अमोल धोपावकर उपस्थित होते.

क्षेत्रभेटीची परवानगी दिल्याबद्दल प्राचार्यांनी व्यवस्थापन सदस्य आणि संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रुपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोदर माखिजा, तसेच विश्वस्त महेश मध्यान सुरेश हिरानंदानी राजकुमार गुरूनानी आणि हरेश मध्यान यांचे आभार मानले.

# श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थी परिषद पदग्रहण सोहळा


श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थी परिषद पदग्रहण सोहळ्याप्रसंगी उपस्थित बाबासाहेब बोडखे, अशोक कानडे, नंदकिशोर भावसार, सुनीता कानडे, तनुजा लोंढे आदी. (छाया – लहू दळवी)

नगर – श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची भावना तसेच लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने विद्यार्थी परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. या विद्यार्थी परिषदेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा नुकताच पार पडला. शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासूनच जबाबदारी स्वीकारून विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, यासाठी विद्यार्थी परिषद महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे.

यावेळी माध्यमिक शिक्षक सोसायटीचे अध्यक्ष बाबासाहेब बोडखे, श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलचे अध्यक्ष अशोक कानडे, उपाध्यक्ष नंदकिशोर भावसार, संचालिका सुनीता कानडे, माजी प्राचार्य तनुजा लोंढे, प्राचार्य माधवी जक्कल यांच्यासह विद्यार्थी, पालक व शिक्षक उपस्थित होते.

बोडखे म्हणाले, भारत देश हा युवकांचा देश म्हणून ओळखला जात असून विद्यार्थ्यांना बालवयातच शिक्षणाबरोबरच कला, क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रम ांची माहिती होणे गरजेचे आहे. श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलच्या माध्यमातून विद्यार्थी परिषद स्थापन करून वर्षभर विविध शालेय उपक्रम यशस्वीपणे राबविले जात असून, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला जात आहे, ही कौतुकास्पद बाब आहे. विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्वल भविष्य असून, विद्यार्थ्यांनी चांगली स्वप्ने पाहून जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे. आदर्श विद्यार्थी घडविण्यासाठी श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जात असल्याचे बोडखे यांनी सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष अशोक कानडे म्हणाले, विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबरच आपली संस्कृती, परंपरा, कला आणि क्रीडा उपक्रमांची माहिती व्हावी, यासाठी विद्यार्थी परिषदेची निवड प्रक्रिया राबविण्यात आली आहे. विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून वर्षभर विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व सामाजिक उपक्रम साजरे केले जाणार आहेत. क्रीडा क्षेत्रामध्ये करिअर करण्याच्या विविध संधी आज उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना या संधींची माहिती देऊन योग्य मार्गदर्शन केले जाईल. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच चांगला व आदर्श विद्यार्थी घडविण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जातील, असे अशोक कानडे यांनी सांगितले. सूत्रसंचालन प्रिया मल्होत्रा यांनी केले. आभार रोक्षनी शेख यांनी मानले.

# श्रीरामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीत ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त अग्निहोत्र यज्ञ

नगर – नगरमधील श्रीरामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटी लिमिटेडचा ४२ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त पतसंस्थेत प्राचीन भारतीय परंपरेतील अग्निहोत्र यज्ञ करण्यात आला. संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी व इतर निमंत्रित अशा ४२ जणांनी अग्निहोत्र करत पतसंस्थेच्या उत्कर्षासाठी प्रार्थना केली.



श्रीरामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त अग्निहोत्र यज्ञ करताना पदाधिकारी.

यावेळी पतसंस्थेचे चेअरमन किसनलाल बंग, संस्थापक अध्यक्ष श्रीगोपाल धूत, व्हा. चेअरमन राजेंद्र मालू, राजेंद्र गुजराथी, सुधीर झालानी, लक्ष्मीकांत झंवर, ओमप्रकाश चांडक, विश्वनाथ कासट, मधुसूदन सारडा, अ‍ॅड. अशोक बंग, अनुराग धूत, राजकमल मिनियार, शोभा राठी, अनुरीता झगडे, देवराव साठे, साईनाथ कावट, व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक, कुमार आपटे, प्रशांत टोणपे व इतर सर्व कर्मचारी तसेच संस्थेचे अंतर्गत लेखापरीक्षक पुनीत व्होरा, गोल्ड व्हॅल्युअर वासुदेव वर्मा व राजेश मीरांडे, अनामिक एडवर्टाइजचे संचालक प्रमोद गांधी आदी उपस्थित होते.

स्वागत करताना चेअरमन किसनलाल बंग म्हणाले, श्रीरामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटी पतसंस्थेला सभासद हिताच्या कारभाराची परंपरा आहे. स्थापनेपासून संस्था सचोटीने कारभार करत उत्कृष्ट आर्थिक कामगिरी करत आहे. संस्था भारतीय संस्कृती आणि परंपरा जपत समाजहितासाठी योगदान देत आहे.

संस्थापक चेअरमन श्रीगोपाल धूत म्हणाले, परमपूज्य डोंगरे महाराज यांच्या प्रेरणेतून पतसंस्थेची स्थापना करण्यात आली. ४२ वर्षांच्या वाटचालीत संस्थेने नेहमीच नीतिमूल्ये जपली आहेत. वर्धापन दिनानिमित्त संस्थेत सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा अग्निहोत्र यज्ञ करण्यात आला. यातून प्रत्येकाच्या मनात आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा जागृत होते. दोन खोल्यांच्या जागेतून सुरू झालेला पतसंस्थेचा प्रवास सर्वांना प्रगतीपथावर नेणारा ठरत आहे. सभासद हिताच्या निर्णयांची परंपरा भविष्यातही कायम राखली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी २५ वर्षांपासून भोपाळ येथील माधवाश्रमचे अग्निहोत्र प्रचारक चेतना साळुंखे, मंजुषा सोनार आणि राजन साळुंखे यांनी अग्निहोत्र म्हणजे अग्नीमध्ये आहुती अर्पण करून केला जाणारा सनातन धर्मातील एक पवित्र विधी असल्याचे सांगितले. विशिष्ट मंत्रोच्चार करत अग्नीत दिलेल्या आहुतींमुळे वातावरण, मन आणि शरीर शुद्ध आणि निरोगी बनते. वातावरणातील नकारात्मकता दूर होण्यास मदत होते. संस्थेच्या अधिकारी मीरा मुळे यांच्या संकल्पनेतून अग्निहोत्राचा उपक्रम राबविण्यात आला. ज्येष्ठ संचालक लक्ष्मीकांत झंवर यांनी आभार मानले. मीरा मुळे यांनी सूत्रसंचालन केले.

# सेवानिवृत्त शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी २३ ऑगस्टला आरोग्यविषयक मार्गदर्शन कार्यशाळा

नगर – महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी, कर्मचारी मध्यवर्ती संघटनेतर्फे सेवानिवृत्त अधिकारी कर्मचार्‍यांसाठी अहिल्यानगर जिल्हा शाखा आयोजित आरोग्य उपक्रम २३ ऑगस्ट रोजी 'आरोग्यदायी माय मराठी' कार्यक्रमांतर्गत 'चालता–बोलता, उठता–बसता स्वतःच स्वतःवर उपचार करा' विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत संघटनेचे जास्तीत जास्त सभासद व नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

नगर शहरातील सावेडी भागातील पाईपलाईन रस्त्यावरील रेणावीकर कॉलनी येथील पेट्रोलपंपासमोर असलेल्या श्रीकृष्ण हॉलमध्ये सकाळी ९ ते दुपारी ५ वाजेपर्यंत होणार आहे. या कार्यशाळेत कंबरदुखी, पाठदुखी, गुडघेदुखी, मायग्रेन, डोकेदुखी, मानसिक ताणतणाव, शुगर, बी.पी.ई. यांसारख्या आजारांवर निसर्गोपचार व शब्दोपचाराच्या सहाय्याने उपचार करण्यात येणार आहेत. याचे प्रात्यक्षिक व स्पष्टीकरण नाशिक येथील निवृत्त केंद्रप्रमुख तथा शब्दोपचार थेरपिस्ट दीपक मानकर हे करणार आहेत.

यासाठी कृतिशील संघटना सभासद व पती/पत्नीसाठी प्रत्येकी ५०० रुपये शुल्क आणि सभासदांव्यतिरिक्त नागरिकांसाठी ७०० रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. नोंदणी केलेल्या व्यक्ती समक्ष येऊन 'आरोग्यदायी माय मराठी' उपक्रम केंद्रातील तज्ज्ञ व्यक्तींशी चर्चा करून त्यांना अपेक्षित मार्गदर्शन मिळवू शकतील. या उपक्रमात जास्तीत जास्त सभासद व नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संघटनेचे पदाधिकारी सर्वश्री चंद्रकांत दळवी, दिलीप थिटे, नागनाथ बोड्डी, अभियंता व्यंकटराव गायकवाड, अभियंता मनोहर पोकळे, अभियंता रामदास साळी आदिंसह इतरांनी केले आहे.

सहभाग व अधिक माहितीसाठी अभियंता रामदास साळी (मोबाईल ९४२०६३२४३९), अभियंता सुनिलदत्त गायकवाड (९८९०१३३४९१), अभियंता प्रकाश अकोलकर (९४२१४३८९९९), सुधाकर रामदिन (९६७३३२९६६५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



माथणी शाळेस मिळालेल्या हायटेक विज्ञान गणित प्रयोगशाळेच्या उद्घाटनप्रसंगी पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थी.

# माथणी शाळेस लोकसहभागातून हायटेक विज्ञान गणित प्रयोगशाळा

नगर – नगर तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत लोकसहभागातून अप्रवा एनर्जी प्रा.लि. या कंपनीकडून विज्ञान – गणित हायटेक प्रयोगशाळा सी .एस. आर. फंडातून लोकसहभाग म्हणून नुकतीच देण्यात आली असल्याची माहिती शाळेतील उपक्रमशील शिक्षक सुनिल अडसूळ व राहुल व्यवहारे यांनी दिली आहे.

या हायटेक प्रयोगशाळेचे उद्घाटन स्वातंत्र्यदिनी सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, पालक व ग्रामस्थ यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेतील उपक्रमशील शिक्षक सुनिल अडसूळ व राहुल व्यवहारे यांनी ही प्रयोगशाळा मिळणे कामी विशेष प्रयत्न केले. या प्रयोगशाळेत विज्ञान – गणिताचे विविध प्रयोग आहेत. यात डोळ्याचा नमुना, जलविद्युत, फुफ्फुसाचा नमुना, पचनसंस्था, फुलांचे अवयव, अन्नाचे पिरॅमिड, ग्रहणे, पवनचक्की, जीवनचक्र, पेशीरचना, चेतासंस्था, पदार्थांच्या अवस्था, अपूर्णांकाची संकल्पना, संख्यारेषा माहिती, कोनाचे प्रकार, त्रिकोण ओळख, चौकोनाचे गुणधर्म, मूलभूत गणिती क्रिया, भौमितिक संकल्पना यांचा समावेश आहे. हे विविध प्रयोग विद्यार्थ्यांना कृतिशीलपणे दाखवले जातात. विद्यार्थी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रयोगाची मांडणी करून प्रयोग करून निष्कर्ष काढतात. यामुळे विद्यार्थ्यांची जिज्ञासूवृत्ती, निरीक्षणशक्ती, तर्कशक्ती, चिकित्सक वृत्ती, विचारशक्तीला आणि समस्या सोडवण्याच्या कौशल्याला चालना मिळत आहे. याबद्दल शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, संगमनेर डायटचे प्राचार्य राजेश बनकर, अधिव्याख्याता मुकुंद दहिफळे, गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते, विस्तार अधिकारी मंदा जगताप, केंद्रप्रमुख प्रल्हाद पवार, ग्रामस्थ आणि पालकांनी अभिनंदन केले आहे.

# आडसूळ टेक्निकल कॅम्पसच्या वाघुळदे यांची इस्रोमध्ये सहाय्यक शास्त्रज्ञ पदावर निवड

नगर – चास येथील आडसूळ टेक्निकल कॅम्पस येथील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचा माजी विद्यार्थी परीस चंद्रकांत वाघुळदे यांची भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) अंतर्गत विक्रम साराभाई स्पेस सेंटर येथे सहाय्यक शास्त्रज्ञ या पदावर निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे आडसूळ टेक्निकल कॅम्पसच्या शैक्षणिक आणि तांत्रिक क्षेत्रातील नावलौकिकात भर पडली असून, संस्थेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.



परीस वाघुळदे यांचा सत्कार करताना आडसूळ टेक्निकल कॅम्पसचे प्राचार्य व संचालक डॉ. प्रदीप एम. पाटील व इतर शिक्षक.

परीस वाघुळदे यांनी आडसूळ टेक्निकल कॅम्पसमधील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातून २०२२–२३ या वर्षी अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण केले. शिक्षणाच्या काळात त्यांनी अभ्यासासोबतच तांत्रिक ज्ञान, कौशल्य आणि मेहनतीच्या जोरावर आपल्या व्यक्तिमत्त्वाची वेगळी ओळख निर्माण केली. सातत्यपूर्ण परिश्रम, जिद्द आणि ध्येय निश्चित करून केलेल्या प्रयत्नांच्या बळावर त्यांनी भारतीय अंतराळ संशोधन क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठित संस्थेत स्थान मिळविले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल प्राचार्य व संचालक डॉ. प्रदीप एम. पाटील यांनी या यशाचे कौतुक करताना परीस वाघुळदे यांची भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) अंतर्गत विक्रम साराभाई स्पेस सेंटर येथे सहाय्यक शास्त्रज्ञ या पदावर झालेली निवड ही आडसूळ टेक्निकल कॅम्पससाठी अभिमानाची बाब असून, ही निवड त्यांच्या गुणवत्तेची आणि मेहनतीची पावती मानली जात आहे. परीस वाघुळदे यांच्या या यशामुळे आडसूळ टेक्निकल कॅम्पसमधील सध्याच्या विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली आहे. त्यांनी भविष्यातही संशोधन, तंत्रज्ञान आणि अंतराळ क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, अशा शुभेच्छा प्राचार्य व संचालक डॉ. प्रदीप एम. पाटील यांनी व्यक्त केल्या.

वाघुळदे म्हणाले, आडसूळ टेक्निकल कॅम्पसतर्फे केलेला हा सन्मान आणि सत्कार माझ्यासाठी अत्यंत आनंदाचा आणि भावनिक क्षण आहे. येथील उच्च शिक्षित व अनुभवी प्राध्यापकवर्ग, अत्याधुनिक प्रयोगशाळा, स्मार्ट क्लासरूम, डिजिटल ग्रंथालय, कौशल्याधारित शिक्षण, प्रभावी मेंटर प्रणाली, उद्योग प्रशिक्षण, इंटर्नशिप, नियमित कॅम्पस प्लेसमेंट, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन यांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो. तसेच शैक्षणिक वेळापत्रकाची काटेकोर अंमलबजावणी, नियमित होणाऱ्या थेअरी व प्रात्यक्षिक तासिका, सराव परीक्षा, क्षेत्रभेटी, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण कार्यक्रम, उद्योजकता विकास कार्यक्रम अशा विविध उपाय योजनांचा अवलंब आडसूळ टेक्निकल कॅम्पसकडून करण्यात येतो. आज मी ज्या ठिकाणी उभा आहे, त्या यशामध्ये माझ्या कुटुंबीयांचा, शिक्षकांचा आणि आडसूळ टेक्निकल कॅम्पसचा मोठा वाटा आहे, असे ते म्हणाले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिरुद्ध आडसूळ, सचिव लीना आडसूळ, संचालक कृष्णा आडसूळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ, सदस्या डॉ. कल्पना आडसूळ, रत्ना आडसूळ आणि पायल आडसूळ, प्राचार्य व संचालक डॉ. प्रदीप पाटील, डॉ. संभाजी पठारे, मेकॅनिकल इंजिनीयरिंग विभागप्रमुख डॉ. मयुर गिते यांच्यासह सर्व विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# 'एक पेड माँ के नाम' उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

## सीक्युएव्ही येथे वृक्षारोपण, अधिकारी आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

नगर – पर्यावरण संवर्धनासोबतच मातृत्व आणि मातृभूमीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या भावनेतून कंट्रोलरेट ऑफ क्वालिटी अ‍ॅश्युरन्स व्हेईकल्स (सीक्युएव्ही) येथे 'एक पेड माँ के नाम' या विशेष वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सीक्युएव्ही चे ब्रिगेडियर राजीव चावला आणि विभागीय वनाधिकारी, सामाजिक वनीकरण अमोल जाधव यांच्या संयुक्त पुढाकारातून हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



सीक्युएव्ही येथे 'एक पेड माँ के नाम' उपक्रमात वृक्षारोपण करताना पद्मश्री पोपटराव पवार यांच्यासह अधिकारी.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पद्मश्री पोपटराव पवार यांनी भूषविले. त्यांच्या हस्ते तसेच उपस्थित मान्यवरांच्या सहभागातून वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण रक्षणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवर अधिकारी, विद्यार्थी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी डॉ. सर्जेराव निमसे, डॉ. विलास कचरे (उपकुलगुरू, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी), पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, मुकुंद चिलवंत (जिल्हा माहिती अधिकारी), विकास पालवे (वरिष्ठ अधीक्षक, पोस्टल सर्व्हिसेस), विवेक मुळीक (अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद), रमेश कासार, प्रमोद सटाले (सहाय्यक संचालक, वित्त सेवा), सोनल केसरकर (सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण) यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमात आर्मी पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी उत्साहाने वृक्षारोपण करत पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी स्वीकारण्याचा संदेश दिला.'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाची संकल्पना केवळ वृक्ष लावण्यापुरती मर्यादित न ठेवता, लावलेल्या प्रत्येक रोपाचे नियमित संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प उपस्थितांनी केला. वृक्ष हे पर्यावरणाचे रक्षण करण्याबरोबरच भावी पिढ्यांसाठी सुरक्षित आणि निरोगी भविष्याची गुंतवणूक असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. सूत्रसंचालन सीक्युएव्ही चे श्री. तेली यांनी केले.

# अहिल्यानगरमध्ये २२ ऑगस्ट रोजी जिल्हा गुंतवणूक परिषदेचे आयोजन

नगर – जिल्ह्यात उद्योग, व्यवसाय आणि गुंतवणुकीला चालना देऊन रोजगारनिर्मितीच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा उद्योग केंद्र, अहिल्यानगर यांच्या वतीने जिल्हा गुंतवणूक परिषद २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद २२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृह, दुसरा मजला, अहिल्यानगर येथे होणार आहे.

या परिषदेचे अध्यक्षस्थान पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील भूषविणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाच्या आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी मैत्रीचे विशेष आयुक्त वैभव वाघमारे तसेच जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

जिल्ह्यात अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित झाल्यास नवीन उद्योगांची स्थापना, स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती, पूरक व्यवसायांना चालना, स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ आणि जिल्ह्याच्या एकूण आर्थिक विकासाला गती मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे ही परिषद अहिल्यानगरच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

जिल्ह्यातील उद्योग व गुंतवणुकीच्या संधींचा व्यापक प्रसार करून अधिकाधिक उद्योजक व गुंतवणूकदारांना जिल्ह्याकडे आकर्षित करण्यासाठी या परिषदेचा उपयोग होणार आहे. उद्योग क्षेत्रातील सर्व संबंधितांनी या परिषदेस उपस्थित राहून उपलब्ध संधींची माहिती घ्यावी आणि जिल्ह्याच्या औद्योगिक विकासात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे उपआयुक्त दीपक शिवदास आणि उद्योग विभाग, नाशिक विभागाच्या सहआयुक्त वृषाली सोने यांनी केले आहे.



आयएमएस संस्थेत प्रवेश घेतलेल्या नवीन विद्यार्थ्यांच्या स्वागत प्रसंगी डॉ. प्रणोती तेलोरे, डॉ. विक्रम बार्नबस, डॉ. एम. बी. मेहता, महेश दीक्षित, नरेंद्र कदम आदी.

# आयएमएस शिक्षण संस्थेत प्रवेश प्रक्रियेला प्रतिसाद

नगर – महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने सन २०२६–२७ ची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून बी. बी. ए व बी.सी.ए. या तीन आणि एम.बी.ए. व एम.सी.ए. या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाला बी.पी.एच.ई. सोसायटीच्या आयएमएस संस्थेत उत्तम प्रतिसाद मिळत असल्याची माहिती प्रभारी संचालक डॉ. प्रणोती तेलोरे यांनी दिली.

संस्थेत प्रवेश घेतलेल्या नवीन विद्यार्थ्यांच्या स्वागत प्रसंगी या त्या बोलत होत्या. यावेळी संस्थेचे उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, माजी संचालक डॉ. एम. बी. मेहता, कार्यालीन अधीक्षक महेश दीक्षित, लेखापाल नरेंद्र कदम, दिपक तुंगार, अश्विनी येळीकर, अनुश्री गुंफेकर, किरण साबळे, सी. डी. मोहिते, सॅम्यूअल उजागरे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

शासनाच्या निवड प्रक्रियेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया सोपी व्हावी म्हणून ऑनलाईन पध्दतीने सर्व सोपस्कार राबविले जातात. प्रवेश प्रक्रियेचा फॉर्म भरण्यापासून फी भरेपर्यंत सर्व सुविधा ऑनलाईन आहेत. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रशासन विभागाच्या वतीने प्रक्रिया पूर्ण झाल्याचे पत्र, पुष्प, सॅक (बॅग) देऊन मुलांचे स्वागत केले जाते. प्रशासन विभागातील कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांसाठी एक हॅंडआउट तयार केले आहे, जे आय. एम. एस. मधल्या त्यांच्या शैक्षणिक कार्यकाळात काय करावे याबाबत मार्गदर्शक सुचना देणारा आहे. शिष्यवृत्तीच्या औपचारिकतेची माहिती देणारा एक क्यूआर कोड प्रशासन विभागाच्या वतीने तयार केला आहे. या दोन्ही गोष्टी विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर आहेत.

आयएमएसमध्ये उच्च दर्जाचे शिक्षण, उत्तम कंपन्यांसोबत असणारे संबंध, यामुळे नोकरीच्या भरपूर संधी मुलांसाठी उपलब्ध आहेत. त्यामुळेच आयएमएस संस्थेला मुलांचे प्राधान्य असल्याचे डॉ. विक्रम बार्नबस यांनी सांगितले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# शहरात सांस्कृतिक कार्यक्रमातून देशभक्तीचा सोहळा साजरा

## माय भारत, क्रीडा कार्यालय, उडाण फाउंडेशनचा उपक्रम

नगर – ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त माय भारत, जिल्हा क्रीडा कार्यालय, उडाण फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्तीवर गीत गायन, नृत्य स्पर्धा आणि महाराष्ट्राची लोकधारा सादरीकरणाचे कार्यक्रम उत्साहात पार पडले.



स्वातंत्र्य दिनानिमित्त माय भारत, जिल्हा क्रीडा कार्यालय, उडाण फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्तीवर गीत गायन, नृत्य स्पर्धा आणि महाराष्ट्राची लोकधारा सादरीकरणाचे कार्यक्रम पार पडले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत तुलसीमातेला पाणी अर्पण करून सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. शंकर अंदानी लिखित लेक लाडकी या पुस्तकाला उडाण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यास आमदार संग्राम जगताप, आमदार अक्षय कर्डिले, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, माय भारत अहिल्यानगरचे जिल्हा समन्वय अधिकारी सत्यजित संतोष, प्रा. डॉ. शंकर अंदानी, जय असोसिएशन ऑफ एनजीओचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष ॲड. महेश शिंदे, प्रा. डॉ. रमेश वाघमारे, ॲड. अनिता दिघे, शाहीर कान्हू सुंबे, शासनाच्या राज्य युवती पुरस्कार विजेत्या जयश्री शिंदे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक उडाण फाउंडेशनच्या अध्यक्षा आरती शिंदे यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत दिनेश शिंदे यांनी केले. स्पर्धेच्या संयोजनासाठी रजनी ताठे, रोहिणी थोरात, वनिता पाडळे, अक्षय शिंदे, जयेश शिंदे, विद्या शिंदे, हेमलता कांबळे, दिपाली उदमले, मंजू रॉय, तुषार शेंडगे, तुषार रणनवरे, अनिल साळवे, कविता अभंग, धीरज ससाणे, भाऊसाहेब पादीर, ॲड. मनीषा भिंगारदिवे, ईसाभाई शेख, भारती शिंदे, बाळू बनसोडे, शुभम शिंदे, अनुराधा शिंदे, तनिश बनसोडे, हर्षल वामन, छाया शिंदे, दिलीप शिंदे, फरान खान, सार्थक जाधव, ऐश्वर्या बनसोडे, प्रतीक्षा वामन आदींनी परिश्रम घेतले. स्पर्धेचे परीक्षण नृत्य विशारद अनंत द्रविड व संगीतकार तथा निवेदक राजेंद्र टाक यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. अनिता दिघे व ॲड. गायत्री गुंड यांनी केले.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, योग ही प्राचीन भारतीय संस्कृती असून, आज जगभराने योगाचा स्वीकार केला आहे. युनिटी योगाच्या माध्यमातून प्रत्यक्ष योग प्रात्यक्षिक या सोहळ्यात युवकांनी सादर केले. मानवी जीवनासाठी दररोज योग केला पाहिजे. नगरमधील विविध शाळा, महाविद्यालय, अ‍ॅकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीवर गीते, नृत्य व महाराष्ट्राची लोकधारा ८० व्या स्वातंत्र्य दिनी सादर करून स्वातंत्र्याचा उत्सव चांगल्या प्रकारे साजरा केल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार अक्षय कर्डिले यांनी उडाण फाउंडेशन ही संस्था रतडगाव या छोट्याश्या गावातून येऊन जिल्हाभर सामाजिक योगदान देत आहे. ही संस्था सात वर्षांपासून महिला, युवक, युवती आणि विद्यार्थ्यांसाठी उल्लेखनीय कार्य करीत आहे. समाजासाठी संस्थेचे कार्य प्रेरणादायी असून, उपस्थितांना त्यांनी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

सत्यजित संतोष म्हणाले, देशभक्तीच्या सांस्कृतिक कार्यक्रमातून सामाजिक ऐक्य घडून येते. नव्या पिढीला आपल्या जुन्या परंपरा आणि इतिहासाची माहिती मिळते. कलाकारांच्या कलागुणांना वाव मिळतो. समाजात बंधुभाव एकात्मता आणि आपुलकी वाढीस लागते. मुलांमधील निरागसता जपा. त्यांचे बालपण बहरु द्या. त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## ८०,००० वर्षांपासूनचे रहस्य

अंतराळातील अनेक रहस्ये आजही मानवाला थक्क करतात. असेच एक आश्चर्य नामीबियाच्या उत्तर भागात पाहायला मिळते. सुमारे ८०,००० वर्षांपूर्वी आकाशातून पडलेला एक महाकाय उल्कापिंड (मेटिओराईट) आजही तिथे तसाच आहे. सामान्यतः शास्त्रज्ञ अशा गोष्टी अभ्यासासाठी प्रयोगशाळेत घेऊन जातात; मात्र हा दगड इतका जड आहे की तो हलवणे अशक्य झाले आहे. या विशाल उल्कापिंडाचे नाव होबा मेटियोराइट असे आहे. १९२० मध्ये नामीबियातील होबा वेस्ट फार्मवर जॅकोबस हर्मानस ब्रिटसब नावाचा शेतकरी शेत नांगरत असताना त्यांचा नांगर एका कडक वस्तूला धडकला. अधिक खोदाई केली असता त्यांना जमिनीखाली धातूचा एक प्रचंड मोठा तुकडा सापडला. हा तुकडा २.७ मीटर लांब, २.७ मीटर रुंद आणि सुमारे ०.९ मीटर जाड आहे, जो दिसायला एखाद्या मोठ्या टेबलसारखा वाटतो.




होबा हा जगातील सर्वात मोठा आणि एकाच तुकड्यात असलेला उल्कापिंड आहे. याचे वजन सुमारे ६० ते ६६ टन आहे. हा उल्कापिंड प्रामुख्याने लोखंड (८४ टक्के) आणि निकेल (१६ टक्के) यांच्या मिश्रणाने बनलेला आहे.

## नेफरतितीच्या थडग्याचा शोध अंतिम टप्प्यात ?

प्रसिद्ध पुरातत्त्वशास्त्रज्ञ आणि इजिप्तचे माजी पुरातत्त्व मंत्री झाही हवास यांनी आपल्या निवृत्तीपूर्वी एक मोठी घोषणा केली आहे. प्राचीन इजिप्तची अत्यंत प्रभावशाली राणी 'नेफरतिती' हिच्या थडग्याचा शोध घेण्याच्या ते अतिशय जवळ असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

झाही हवास यांच्या जीवनावर आधारित 'द मॅन विथ द हॅट' हा नवीन माहितीपट २० जानेवारी रोजी विविध स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होत आहे. या माहितीपटात बोलताना हवास म्हणाले, 'जर मला हा शोध लावता आला, तर इजिप्तच्या सर्वात महत्त्वाच्या राणीच्या थडग्याचा शोध लावून माझ्या कारकिर्दीचा शेवट करताना मला प्रचंड आनंद होईल.' राणी नेफरतिती ही राजा 'अखेनातेन' (इ.स.पूर्व १३५३-१३३६) याची पत्नी होती.



या राजाने इजिप्तमध्ये अनेक देवांच्या पूजेऐवजी केवळ 'आतेन' (सूर्यदेव) या एकाच देवाची पूजा करण्याची धार्मिक क्रांती घडवून आणली होती. काही पुरातत्वशास्त्रज्ञांच्या मते, पतीच्या मृत्यूनंतर नेफरतितीने 'नेफरनेफरुआतेन' हे नाव धारण करून काही काळ इजिप्तवर राजा (फेरो) म्हणून शासन केले होते. अनेक प्राचीन चित्रांमध्ये ती शत्रूचा संहार करताना दिसते, जे अधिकार सहसा केवळ पुरुषांना (फेरो) असायचे. हवास आणि त्यांची टीम गेली अनेक वर्षे इजिप्तच्या 'व्हॅली ऑफ द किंग्स' भागात उत्खनन करत आहे. सध्या त्यांचे काम पूर्व खों?यात, राणी हत्शेपसुतच्या थडग्याजवळ सुरू आहे.

हवास सांगतात की, 'आमच्याकडे सध्या ठोस पुरावा नसला तरी, माझी अंतर्प्रेरणा सांगते की नेफरतितीचे थडगे याच भागात असण्याची शक्यता आहे. हे काम वेगाने सुरू असून लवकरच हा शोध लागू शकतो. या माहितीपटात हवास यांनी केवळ शोधाबद्दलच नाही, तर इजिप्तचा सांस्कृतिक वारसा परत आणण्याबद्दलही भाष्य केले आहे. ते सध्या पुढील तीन महत्त्वाच्या वस्तू इजिप्तला परत मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. १. रोसेट्टा स्टोन (सध्या ब्रिटिश म्युझियममध्ये) २. डेंडेरा झोडियाक (सध्या लूव्र म्युझियममध्ये) ३. नेफरतितीचा पुतळा/अर्धपुतळा (सध्या जर्मनीतील न्यूस म्युझियममध्ये). हवास यांच्या मते, या वस्तू इजिप्शियन अस्मितेचे प्रतीक आहेत आणि त्यांचे खरे स्थान कैरो येथील नवीन 'ग्रँड इजिप्शियन म्युझियम' मध्येच असायला हवे.



## गोष्ट ४० फुटी सापाची

शास्त्रज्ञांनी आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या समुद्री सापाची ओळख पटवली आहे, ज्याच्या अवाढव्य आकारामुळे जगभरातील संशोधक थक्क झाले आहेत. 'पॅलिओफिस कोलोसियस' (Palaeophis colossaeus) असे नाव असलेला हा साप लाखो वर्षांपूर्वी समुद्रावर राज्य करत होता. हा साप आजच्या आधुनिक समुद्री सापांच्या तुलनेत कित्येक पटीने मोठा आणि शक्तिशाली शिकारी होता. अभ्यासानुसार, हा महाकाय साप ५.६ कोटी ते ३.४ कोटी वर्षांपूर्वी (इओसीन युग) अस्तित्वात होता. आजचे समुद्री साप साधारणपणे २ ते ३ मीटर लांब असतात, मात्र पॅलिओफिस कोलोसियसची लांबी ८ ते १२ मीटर (सुमारे २६ ते ४० फूट) इतकी होती. शास्त्रज्ञांना या सापाच्या पाठीच्या कण्याचे जे अवशेष मिळाले आहेत, ते आतापर्यंत सापडलेल्या कोणत्याही सापाच्या तुलनेत असामान्यपणे मोठे आहेत.


या सापाचे अवशेष ज्या भागात सापडले, तो भाग एकेकाळी उत्तर आफ्रिकेला व्यापून असलेल्या 'ट्रान्स-सहारा सीवे' नावाचा उथळ समुद्र होता. आज जिथे सहाराचे वाळवंट आहे, तिथे एकेकाळी उष्ण आणि किनारपट्टीचे पाणी होते. शास्त्रज्ञांच्या मते हा साप खोल समुद्राऐवजी उथळ पाण्यात राहणे पसंत करायचा. त्या काळातील जास्त तापमानामुळे या मोठ्या सरपटणाऱ्या जीवांना जगणे सोपे झाले होते. अन्नासाठी तो मोठ्या माशांसह शार्क आणि मगरीसारख्या दिसणाऱ्या 'डॉयरॉसॉरिड' प्राण्यांची शिकार करत असावा. आजच्या काळातील सर्वात लांब समुद्री साप (पिवळा समुद्री साप) जास्तीत जास्त ३ मीटरपर्यंत वाढतो.

जमिनीवर आढळणारा आतापर्यंतचा सर्वात लांब साप 'टायटॅनोबोआ' (हा देखील आता नामशेष झाला आहे) याच्याशी तुलना केली असता, पॅलिओफिस कोलोसियस हा त्याला तगडी टक्कर देणारा जलचर होता. संशोधकांकडे हा साप नेमकी कशाची शिकार करायचा याचा थेट पुरावा नसला तरी, त्याच्या आकारावरून असा अंदाज लावला जातो की त्याला मोठ्या शिकारीची गरज होती. जर या सापाची कवटी आधुनिक सापांप्रमाणे लवचिक असेल, तर तो मोठ्या शार्क किंवा मगरींना अख्खे गिळंकृत करण्याची क्षमता ठेवत असावा.

## 'झोम्बी' पेशी घालवा, अपस्मार पळवा !

मेंदूतील मृतवत पण पूर्णपणे नष्ट न झालेल्या, ज्याला वैज्ञानिक भाषेत 'अनडेड' किंवा 'झोम्बी' पेशी म्हटले जाते, त्यांचा नायनाट केल्यास अपस्माराच्या एका सामान्य प्रकारावर उपचार करणे शक्य असल्याचे एका नवीन संशोधनातून समोर आले आहे.

'ॲनाल्स ऑफ न्युरोलॉजी' या जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या या संशोधनात प्रामुख्याने 'टेम्पोरल लोब एपिलेप्सी' वर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. हा जगातील सर्वात सामान्य फिटस्चा आजार असून, जगभरात सुमारे ५ कोटी लोक यामुळे बाधित आहेत. उंदरांवर केलेल्या प्रयोगादरम्यान असे दिसून आले की, मेंदूतील या खराब झालेल्या पेशी काढून टाकल्यामुळे त्यांच्या स्मृतिमध्ये सुधारणा झाली आणि फिटसब येण्याचे प्रमाणही कमी झाले. जेव्हा मेंदूतील पेशींचे नुकसान होते, तेव्हा सामान्यतः त्या स्वतःहून नष्ट होतात. मात्र, काही पेशी नष्ट न होता 'सेनेसन्स' नावाच्या अवस्थेत जातात. या पेशी निरोगी पेशींसारख्या विभागल्या जात नाहीत, पण त्या मरतही नाहीत. म्हणूनच शास्त्रज्ञ त्यांना 'झोम्बी पेशी' म्हणतात.



### रुग्णांसाठी आशेचा किरण

अनेकांना डोक्याला मार लागल्यामुळे किंवा संसर्गामुळे अपस्माराचा त्रास होतो. सध्या अनेक रुग्णांना औषधांचा फायदा न झाल्यामुळे मेंदूची शस्त्रक्रिया किंवा 'नर्व्ह-स्टिम्युलेशन' उपकरणांचा आधार घ्यावा लागतो. या संशोधनामुळे आता शस्त्रक्रियेशिवाय 'झोम्बी पेशी' नष्ट करून उपचार करण्याच्या नवीन पद्धती विकसित होऊ शकतात.

या पेशींमुळे मेंदूच्या उतींवर जखमांच्या खुणा तयार होतात, ज्यामुळे फिटसब येण्याची शक्यता वाढते. जॉर्जटाऊन विद्यापीठातील औषधशास्त्रज्ञ आणि अभ्यासाचे सह-लेखक पॅट्रिक फोर्सेली यांनी सांगितले की, संशोधकांनी अपस्मार असलेल्या रुग्णांच्या मेंदूच्या ऊतींचा अभ्यास केला. सामान्य व्यक्तींच्या तुलनेत अपस्मार असलेल्या रुग्णांच्या मेंदूमध्ये या 'झोम्बी' पेशींचे प्रमाण पाच पटीने जास्त असल्याचे आढळले. सध्याची औषधे केवळ फिटस्ची तीव्रता कमी करतात, परंतु, आजार मुळापासून बरा करत नाहीत. हे नवीन संशोधन अशा औषधांच्या निर्मितीसाठी मार्ग मोकळा करू शकते, जे आजाराच्या कारणावरच थेट उपचार करतील.



## लाल व केशरी रंगाच्या गाजरांमध्ये फरक काय ?

आपण बाजारात गेल्यावर तिथे आपल्याला लाल आणि केशरी अशा दोन्ही रंगांची गाजरे पाहायला मिळतात. ही दोन्ही गाजरे दिसायला सारखीच असली, तरी त्यांच्या चवीमध्ये, पौष्टिकतेमध्ये आणि वापरामध्ये मोठा फरक असतो. लाल गाजरामध्ये 'लायकोपिन' नावाचे अँटी-ऑक्सिडंट भरपूर प्रमाणात असते. हेच घटक टोमॅटोमध्येही आढळते, जे हृदयाच्या आरोग्यासाठी आणि त्वचेसाठी अत्यंत फायदेशीर असते. केशरी रंगाच्या गाजरात 'बीटा-कॅरोटीन' चे प्रमाण सर्वाधिक असते. आपले शरीर या घटकाचे रूपांतर व्हिटॅमिन ए मध्ये करते, जे डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. लाल गाजरे चवीला अधिक गोड आणि रसाळ असतात. त्यांचा पोत थोडा मऊ असतो. त्यामुळेच भारतात हिवाळ्यात लाल गाजराचा हलवा बनवण्यासाठी यालाच पसंती दिली जाते. केशरी गाजर हे लाल गाजराच्या तुलनेत कमी गोड असतात. ती जास्त कुरकुरीत असतात, त्यामुळे सॅलडमध्ये किंवा कच्ची खाण्यासाठी ही जास्त वापरली जातात.

लाल गाजर हे प्रामुख्याने हिवाळ्याच्या हंगामात नोव्हेंबर ते फेब्रुवारी उपलब्ध असते. हे प्रामुख्याने आशियाई देशांमध्ये, विशेषतः भारत आणि पाकिस्तानात मोठ्या प्रमाणावर पिकवले जाते. केशरी गाजर हे वर्षभर उपलब्ध असते. पाश्चात्य देशांमध्ये हे जास्त लोकप्रिय आहे. हायब्रिड प्रजातीमुळे आता भारतातही ते बाराही महिने मिळते. डोळ्यांच्या आरोग्यासाठी आणि सॅलडसाठी केशरी गाजर उत्तम आहे, तर हृदयाचे आरोग्य आणि चविष्ट हलव्यासाठी लाल गाजर खाणे फायदेशीर ठरते.

## आढळले ६०० वर्षांपूर्वीचे जहाज

डेन्मार्कच्या किनारपट्टीवर पुरातत्त्वशास्त्रज्ञांना मध्ययुगीन काळातील एका महाकाय जहाजाचे अवशेष सापडले आहेत. हे जहाज कॉग प्रकारातील असून ते १४०० च्या दशकातील आहे. या जहाजाला स्वालगेट २ असे नाव देण्यात आले आहे. हे जहाज २८ मीटर लांब, ९ मीटर रुंद आणि ६ मीटर उंच आहे. हे जहाज सुमारे ३०० टन माल वाहून नेण्यास सक्षम होते. कॉग ही मध्ययुगातील सर्वात महत्त्वाची मालवाहू जहाजे होती. हे आतापर्यंत सापडलेले जगातील सर्वात मोठे कॉग जहाज आहे.



समुद्र तळामध्ये पुरातत्त्वशास्त्रज्ञांना शोध घेत असताना स्वालगेट २ या जहाजाचे अवशेष सापडले. त्यामध्ये आढळलेल्या काही खास गोष्टी या जहाजाच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकतात. जहाजाच्या मागील बाजूस लाकडापासून बनवलेले एक सुरक्षित छत सापडले आहे. त्याला स्टर्न कॅसल असे म्हणतात. जहाजाच्या अशा रचनेचे पुरावे रेखाचित्रांमध्ये असायचे, पण प्रत्यक्ष अवशेषांच्या रूपात ते पहिल्यांदाच सापडले जहाजावर विटांनी बांधलेले स्वयंपाकघर आढळले आहे. त्या काळी समुद्रात गरम जेवण बनवण्याची ही प्रगत सोय पाहून शास्त्रज्ञ थक्क झाले आहेत. जहाजावर लाकडी ताट, शूज, कंगवा, जपमाळ आणि स्वयंपाकाची पितळी भांडी सापडली आहेत. यावरून त्या काळातील खलाशांच्या जीवनाची माहिती मिळते. हे जहाज समुद्रात १३ मीटर खोलीवर वाळूखाली गाडले गेले होते, त्यामुळे लाकूड आणि दोरखंड अजूनही चांगल्या स्थितीत आहेत.

उत्खनन प्रमुख ऑट्टो उल्डम यांच्या मते, हा शोध सागरी पुरातत्त्वशास्त्रातील एक मैलाचा दगड आहे. यावरून कळून येते की १४ व्या शतकातच तंत्रज्ञान इतके प्रगत झाले होते की, इतकी मोठी जहाजे आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी वापरली जात होती. हे जहाज नेदरलंड्समध्ये बांधले गेले असावे असा अंदाज आहे.

## मंगळावरील जीवसृष्टीचे पुरावे तिथेच अडकणार ?

मंगळ ग्रहावर कधीकाळी जीवसृष्टी होती का, या सर्वात मोठ्या प्रश्नाचे उत्तर देणारे पुरावे कदाचित तिथल्या खडकांमध्येच कायमचे अडकून राहण्याची भीती निर्माण झाली आहे. अमेरिकन सिनेटने 'मार्स सॅम्पल रिटर्न' (एम.एस.आर.) कार्यक्रमासाठी निधी नाकारल्याने ही मोहीम आता जवळपास रद्द झाल्याचे चित्र आहे.

सोमवारी (१५ जानेवारी) अमेरिकन सिनेटने खर्च विधेयक मंजूर केले. यामध्ये नासाच्या इतर विज्ञानाशी संबंधित बजेटमध्ये सुधारणा करण्यात आली असली तरी, 'मार्स सॅम्पल रिटर्न' कार्यक्रमाला मात्र अपवाद ठरवून त्याचा निधी रोखण्यात आला आहे. 'हा करार सध्याच्या एम.एस.आर. कार्यक्रमाला पाठिंबा देत नाही, असे कायदेतज्ज्ञांनी अहवालात नमूद केले आहे. नासाचे पर्सिव्हरन्स रोव्हर सध्या मंगळावर ३० पेक्षा जास्त भूगर्भीय नमुने गोळा करून बसले आहे. यात अशा एका नमुन्याचा समावेश आहे, ज्याचे वर्णन नासाने 'मंगळावरील जीवसृष्टीचे आतापर्यंतचे सर्वात स्पष्ट चिन्ह' असे केले होते.




ही मोहीम रद्द झाल्यामुळे हे नमुने पृथ्वीवर आणण्याचे स्वप्न धुळीस मिळण्याची शक्यता आहे. जानेवारी २०२५ मध्ये एका स्वतंत्र समितीने या मोहिमेचा खर्च तब्बल ११ अब्ज डॉलर्स (सुमारे ९२ हजार कोटी रुपये) इतका होऊ शकतो, असा अंदाज वर्तवला होता. या अंदाजानुसार, हे नमुने २०४० पर्यंतच पृथ्वीवर पोहोचू शकले असते. नासाने खर्च कमी करण्यासाठी व्यावसायिक पर्यायांचा (खासगी क्षेत्र) विचार केला होता, ज्यामध्ये ५.८ ते ७.१ अब्ज डॉलर्स खर्च अपेक्षित होता.यावर २०२६ मध्ये निर्णय घेतला जाणार होता; परंतु त्यापूर्वीच सिनेटने निधीला कात्री लावली आहे. मोहीम रद्द झाली असली तरी नासाकडे एक संधी शिल्लक आहे. सिनेटने 'मार्स फ्युचर मिशन्स'साठी ११० दशलक्ष डॉलर्स मंजूर केले आहेत. हे पैसे रडार, लँडिंग सिस्टम आणि प्रगत तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी वापरले जातील. हेच तंत्रज्ञान भविष्यात 'मार्स सॅम्पल रिटर्न' पुनरुज्जीवित करण्यासाठी किंवा चंद्रावरील मानवी मोहिमांसाठी उपयुक्त ठरू शकते.

## समुद्रतळाशी सापडला 'महाकाय' काळा पोवळा

न्यूझीलंडच्या किनारपट्टीवर संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांना समुद्राच्या अथांग खोलीत एक अत्यंत दुर्मीळ आणि आश्चर्यकारक गोष्ट सापडली आहे. शास्त्रज्ञांनी आतापर्यंतचा सर्वात मोठा 'ब्लॅक कोरल' (काळा पोवळा/प्रवाळ) शोधून काढला असून, त्याचे अवाढव्य स्वरूप पाहून तज्ज्ञही थक्क झाले आहेत.

वेलिंग्टनच्या व्हिक्टोरिया युनिव्हर्सिटीच्या शास्त्रज्ञांनी हा शोध लावला आहे. हा पोवळा १३ फुटांपेक्षा जास्त उंच आणि सुमारे १५ फूट रुंद आहे. शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार, हा पोवळा ३०० ते ४०० वर्षे जुना असावा. सागरी जीवशास्त्रज्ञ प्रोफेसर जेम्स बेल यांनी सांगितले की, त्यांच्या २५ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी इतका मोठा पोवळा कधीच पाहिला नाही. सहसा हे पोवळे २-३ मीटरपेक्षा मोठे नसतात. याचे नाव 'ब्लॅक कोरल' असले तरी तो वरून पांढरा दिसतो. याचे कारण असे की, त्याच्या सांगाड्यावर राहणारे जिवंत जीव पांढऱ्या रंगाचे असतात. मात्र, या जीवाचा मुख्य सांगाडा हा गडद काळ्या रंगाचा असतो.




तज्ज्ञांच्या मते, हे महाकाय पोवळे वाचवणे अत्यंत गरजेचे आहे. हे पोवळे अत्यंत संथ गतीने वाढतात. त्यांना थोडी जरी इजा झाली तरी ती भरून निघायला अनेक वर्षे लागतात. हे विशाल पोवळे समुद्राच्या खोलीत राहणाऱ्या इतर लहान जीवांसाठी एखाद्या घराप्रमाणे काम करतात. मोठे आणि जुने पोवळे आपली संख्या वाढवण्यासाठी आणि सागरी परिसंस्था टिकवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात.

न्यूझीलंडच्या पर्यावरण विभागाचे तज्ज्ञ रिचर्ड किंसे यांनी हा अनुभव 'दुर्मीळ आणि अविस्मरणीय' असल्याचे म्हटले आहे. सध्या सरकार आणि शास्त्रज्ञ मिळून अशा पोवळ्यांचा नकाशा तयार करत आहेत, जेणेकरून त्यांचे संरक्षण करता येईल. कायद्यानुसार या पोवळ्यांना हानी पोहोचवणे किंवा गोळा करणे हा गुन्हा आहे. काही देशांमध्ये याचा उपयोग औषधे आणि दागिने बनवण्यासाठी केला जातो; परंतु त्यांच्या अस्तित्वाचा धोका लक्षात घेता आता संरक्षणावर भर दिला जात आहे.

## भारतीय कंपन्यांमध्ये 'एआय'चा डंका !

भारतातील कॉर्पोरेट क्षेत्रात आर्टिफीशिअल इंटेलिजन्स (एआय) चा वापर वेगाने वाढत आहे. कर्मचारी आणि व्यवस्थापन या दोघांचेही असे मत आहे की, 'एआय'मुळे कामाचा दर्जा सुधारतो, डेटा समजून घेणे सोपे होते आणि अचूक निर्णय घेण्यास मदत होते. याच सकारात्मक दृष्टिकोनामुळे भारतीय कंपन्यांमध्ये 'एआय'चा स्वीकार झपाट्याने होत असल्याचे एका ताज्या अहवालातून समोर आले आहे.

या सर्वेक्षणातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे भारताचा 'टॅलेंट हेल्थ स्कोर'. भारताने ८२ गुणांसह जगात अव्वल स्थान पटकावले आहे, तर जगाचा सरासरी स्कोर केवळ ६५ आहे. कर्मचारी आपल्या कंपनीतील वातावरण, शिकण्याच्या संधी आणि त्यांना मिळणारा सन्मान याबद्दल किती समाधानी आहेत, हे या स्कोरवरून ठरते. भारतातील बहुतांश कर्मचाऱ्यांच्या मते, त्यांचे मॅनेजर्स त्यांच्यावर विश्वास ठेवतात आणि त्यांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देतात, ज्यामुळे कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास वाढतो.



'ईवाय इंडिया'चे पार्टनर अनुराग मलिक यांच्या मते, भारताने एआय तंत्रज्ञान आत्मसात करण्यात मोठी आघाडी घेतली आहे. सध्या कंपन्या तंत्रज्ञान, कर्मचाऱ्यांचे कौशल्य आणि त्यांचा अनुभव यांचा योग्य समतोल राखण्यावर भर देत आहेत. 'एआय'चा योग्य वापर केवळ कामाची क्षमताच नाही, तर कर्मचाऱ्यांचे मानसिक आरोग्य सुधारण्यासही मदत करत आहे. अहवालानुसार, भारतीय कर्मचाऱ्यांसाठी बोनस, कामाच्या वेळेतील लवचिकता, योग्य पगार आणि आरोग्य सुविधा हे घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत. यासोबतच, कंपन्या आता कर्मचाऱ्यांना 'एआय' शी संबंधित प्रशिक्षण देण्याला प्राधान्य देत आहेत. ३४ टक्के कंपन्यांनी 'एआय स्किल डेव्हलपमेंट'ला आपल्या प्राधान्य सूचीत स्थान दिले आहे. तंत्रज्ञानासोबतच कर्मचाऱ्यांच्या गरजांकडे लक्ष दिल्याने भारतीय टॅलेंट अधिक सक्षम होत असल्याचे चित्र आहे.

## फ्लेक्सीकॅप फंड : लवचिकता आणि निर्णयक्षमतेचा संगम

फ्लेक्सीकॅप फंड इतर इक्विटी फंडांप्रमाणे किमान वितरणाशी बांधलेले नसतात. 'तुम्ही मोठ्या, मध्यम किंवा लहान कॅप्समध्ये कमीत कमी इतकी गुंतवणूक करणे आवश्यक आहे,' या आवश्यकतेची कोणतीही टांगती तलवार त्यात व्यवस्थापकाच्या डोक्यावर लटकत नसते. एखाद्या अस्थिर कालखंडात बाजी लावण्यासाठी लार्ज कॅप्स सुरक्षित वाटत असतील तर फंड त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात झुकू शकतो. त्याऐवजी अर्थव्यवस्था वाढत असल्यामुळे मिड आणि स्मॉल कॅप्स लाभदायक वाटू लागले तर व्यवस्थापक वाट बदलून त्या संधीचा पाठलाग करू शकतात.



विशाल छाजेड

या स्वातंत्र्याचा अर्थ असा होतो, की हे फंड सतत बाजाराचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करीत असतात. व्यवस्थापक सामान्यत: त्याबद्दल विचार करण्याचे दोन मार्ग एकत्र करतात : एक व्यापक दृश्याची दृष्टी – व्याज दर, महागाई आणि जागतिक ट्रेंड यासारख्या गोष्टींकडे लक्ष देऊन संधी कोठे आहेत हे ठरवणे; आणि एक जवळचे दृश्य – कंपन्यांच्या मागितल्या जाणाऱ्या किंमतींना त्या खरोखर पात्र आहेत की नाही हे तपासण्यासाठी प्रत्येक कंपनीची माहिती घेणे. यामध्ये 'ठराविक पाककृती' कमी असते आणि 'त्या दिवशी बाजारात काय ताजे आहे यावर आधारित आचाऱ्याने प्रयोग करणे' अधिक असते.

अशा प्रकारे, फ्लेक्सीकॅप गुंतवणूक ही खरोखर निर्णयक्षमतेवर लावलेली पैज असते. आपण एक निश्चित सूत्र निवडत नाही; आपण बाजारपेठ कोठे जात आहे, याविषयी अन्य कोणाच्या कौशल्यावर विश्वास ठेवत असतो आणि दीर्घकालीन संपत्ती तयार करण्यासाठी त्यांची तज्ज्ञता पुरेशी अनुभवप्राप्त असेल, अशी आशा करतो.

त्यानुसार,गुंतवणूकदार आयसीआयसीआय प्रुडेन्शियल फ्लेक्सीकॅप फंडाचा विचार करू शकतात. बाजार भांडवलातील त्याचे गतिशील वितरण बाजाराच्या बदलत्या परिस्थितीतून मार्गक्रमण करण्यास मदत करते. या योजनेने ३० जून २०२६ पर्यंत एका वर्षात ५.०९ टक्के , तीन वर्षांत १५.३९ टक्के आणि स्थापनेपासून (जुलै २०२१) १४.५५ टक्के चक्रवाढ दराने वाढ दिली आहे. त्याचे निव्वळ मालमत्ता मूल्य (एनएव्ही) स्थापनेपासून १० पासून २० पर्यंत दुप्पट झाले असून त्याला मजबूत गुंतवणूक प्रक्रिया आणि उच्च सक्रिय शेअरचे पाठबळ लाभले आहे.

## गणेश मंडळ कार्यकर्ते व ढोल-ताशा पथकांना सीपीआर प्रशिक्षण देण्याची गंधे यांची मागणी

नगर – आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश मंडळातील कार्यकर्ते तसेच ढोल-ताशा पथकातील वादकांना सीपीआर व प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देण्यात यावे, अशी मागणी भाजपा अहिल्यानगर महानगर जिल्हा कार्यालय मंत्री मुकुल गंधे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.

यावर्षी १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या कालावधीत जिल्ह्यात तसेच अहिल्यानगर शहरात गणेशोत्सव उत्साहात साजरा होणार आहे. गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीदरम्यान मोठ्या संख्येने नागरिक, गणेश मंडळांचे कार्यकर्ते आणि ढोल-ताशा पथकातील वादक सहभागी होत असतात. या काळात अचानक उद्भवणाऱ्या वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत मिळणे आवश्यक असल्याने संबंधितांना सीपीआर व प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देणे गरजेचे असल्याचे गंधे यांनी निवेदनात म्हटले आहे.

जिल्हा रुग्णालयाच्या नवीन इमारतीत एमआरआय युनिट स्थापन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्या माध्यमातून संजीवनी उपक्रमांतर्गत गणेश मंडळांचे कार्यकर्ते आणि ढोल-ताशा पथकातील वादकांना सीपीआर तसेच प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण आयोजित करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

विसर्जन मिरवणुकी- दरम्यान आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास प्रशिक्षित कार्यकर्ते प्राथमिक मदत देऊ शकतील. त्यामुळे यावर्षीपासूनच ढोल-ताशा पथकातील वादक तसेच गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात यावी, अशी विनंती मुकुल गंधे यांनी केली आहे.

या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तसेच जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर यांना देण्यात आल्या आहेत.

## गुरुवाणी – २६
### कुळाची परंपरा अखंड रहावी...



'करा किंवा नका करू' तरीही आश्रव होतो अशी व्यवस्था तयार केली जाऊ शकते. आणि ही व्यवस्था करणारे तीर्थंकर असतात. पॅसिव्ह आश्रव चोवीस तास चालू असतो, त्यात जास्त ताकद असते. भरत चक्रवर्ती अलंकार सभेत (ब्युटी पार्लर) गेले होते. याठिकाणी ते स्वतःला अलंकृत करत असतात. तिथे चहुबाजूंनी आरसे बसवलेले असतात. भरत चक्रवर्ती अलंकार परिधान करताना आरशात पाहत असतो. त्याला दिसले माझे एक बोट खूप तेजस्वी दिसतय. त्याच्या लक्षात आले त्या बोटात अंगठी नाही म्हणुन ते तेजस्वी दिसतय. त्याने एक एक आभूषण काढण्यास सुरुवात केली, तसतसे त्याला अधिक तेजत्व दिसू लागले. आभूषण हे शरीराला झाकणारे असतात, ते आतलं खरं तेज दिसू देत नाही. भरत चक्रवर्तीने सर्व आभूषण उतरवले व ध्यान लावले. त्याला केवल ज्ञान प्राप्त झाले. जाताना तो 'चक्रवर्ती' होता, येताना 'योगेश्वर' बनला. तो जीन शासनाच्या मार्गावर चालू पडला. भरताचा उत्तराधिकारीही वडीलांप्रमाणे अलंकार सभेत गेला तोही केवलज्ञानी बनला. असे आठ उत्तराधिकारी केवल ज्ञानी बनले. यानंतर एक उत्तराधिकारी आला. त्याने आपल्या कुळाचा इतिहास वाचला. त्याने अर्थ लावला की, जो अलंकार सभेत जातो तो बिघडतो. त्यामुळे त्याने आदेश काढला आणि अलंकार सभाच जमीनदोस्त केली. पुढे भरत कुळात केवल ज्ञानी बनणे बंद झाले. भरताने बनवलेलं साधना स्ट्रक्चर कायमचे पडले. काही जण बापसे बेटा सवाई असतात. काही जण कुळाची परंपरा भस्मसात करतात. आश्रवचे पहिले काम निर्जरा करायची असते. शुभ आश्रव झाला तर आतील सर्व अशुभ निघून जाते. अशुभचा आश्रव झाला तर शुभची निर्जरा होते. आचार्यश्रींच्या या भूमीत गुरूभक्ती शिकवावी लागत नाही, इथल्या वातावरणाताच गुरूभक्ती आपोआप निर्माण होते. जिन शासन सांगते, 'सबसे ज्यादा पुण्य पाप अनुमोदना में होता है'. तीर्थंकरांनी दिलेले ज्ञान अधिक प्रभावी असते कारण त्यांच्याकडील पुण्य आहे. हे पुण्य ग्रहण करण्याचे सूत्र आहे भक्ती. झोपेत पुण्याचे आश्रव सुरू होईल, तेंव्हा जागेपणीही निगेटिव्ह विचार येणार नाहीत.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

## न्यूमातर्फे २३ ऑगस्टला मोफत श्रवण तपासणी शिबिराचे आयोजन

नगर – श्रवणदोषामुळे संवाद, शिक्षण, कामकाज आणि सामाजिक जीवनावर परिणाम होऊ शकतो. ही बाब लक्षात घेऊन न्यूमा हिअरिंग एड अ‍ॅण्ड स्पीच थेरपी क्लिनिकतर्फे २३ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत मोफत श्रवण तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

लहान मुलांपासून युवक, प्रौढ आणि ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांसाठी हे शिबिर खुले आहे. शिबिरात श्रवण तपासणी, आवश्यक मार्गदर्शन तसेच हिअरिंग एड ट्रायल ची सुविधा उपलब्ध राहणार आहे. श्रवणयंत्रांवर ३० टक्क्यांपर्यंत विशेष सवलत देण्यात येणार आहे. वारंवार काय विचारणे, टीव्हीचा आवाज वाढवणे, संभाषण समजण्यास अडचण येणे, फोनवर बोलताना त्रास होणे किंवा कानात सतत आवाज येणे अशी लक्षणे असल्यास तपासणी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. लहान मुलांमध्ये आवाजाला प्रतिसाद न देणे किंवा भाषा-वाचा विकासात अडचणी जाणवल्यास पालकांनीही तपासणी करून घ्यावी. शिबिरासाठी पूर्वनोंदणी आवश्यक असून, ९३७११२१२१० या क्रमांकावर संपर्क साधावा. शिबिराचे ठिकाण न्यूमा हिअरिंग एड अ‍ॅण्ड स्पीच थेरपी क्लिनिक, ड्रीमलँड अपार्टमेंट झोपडी कॅन्टीन, सावेडी रोड, अहिल्यानगर येथे आहे.

## आजार होण्यापूर्वी काळजी घेण्यासाठी आरोग्य शिबिरांची भूमिका महत्त्वाची : दिपाली ललवाणी

### आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये बालरोग तपासणी शिबिराला प्रतिसाद

नगर – निरोगी व सदृढ समाजाचे स्वप्न घेऊन आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत रुग्णसेवा पोहोचविण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. सेवाभावातून विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करून समाजातील गरजू घटकांना आरोग्यसेवेचा आधार देण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न केला जात आहे. या सेवा कार्यात सहभागी होण्याची संधी व भाग्य मिळाले असून, आजार होण्यापूर्वी घेतलेली काळजी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे भविष्यातील गंभीर आजारांचा धोका टाळता येऊ शकतो. गरजू नागरिकांनी आरोग्य शिबिरांचा लाभ घेऊन भविष्यातील गंभीर आजार टाळण्यासाठी आवश्यलक काळजी घ्यावी, असे आवाहन दिपाली ललवाणी यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल ण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त प्रवरासंगम येथील अशोक सुवालाल ललवाणी परिवाराच्या वतीने मोफत बालरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी दिपाली ललवाणी बोलत होत्या. यावेळी सुमित ललवाणी, माईरा ललवाणी, डॉ. वसंत कटारिया, सतीश लोढा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. आशिष भंडारी, माणकचंद कटारिया, अभय गुगळे, वसंत चोपडा, बालरोगतज्ज्ञ डॉ. निखीलकुमार गुट्टे, डॉ. वैभवी वंजारे, डॉ. दिपी अग्रवाल आदी उपस्थित होते.



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये बालरोग तपासणी शिबिराचे उद्घाटन करताना दिपाली ललवाणी, सुमित ललवाणी, माईरा ललवाणी, डॉ. वसंत कटारिया, सतीश लोढा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. आशिष भंडारी, माणकचंद कटारिया, अभय गुगळे, वसंत चोपडा, डॉ. निखीलकुमार गुट्टे, डॉ. वैभवी वंजारे, डॉ. दिपी अग्रवाल आदी.

प्रास्ताविकात डॉ. वसंत कटारिया म्हणाले की, प्रवरासंगम येथील ललवाणी परिवार धार्मिक व सामाजिक कार्याशी जोडला गेला असून, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या विविध सेवा कार्यातही त्यांचे योगदान राहिले आहे. समाज निरोगी राहावा आणि सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हॉस्पिटलच्या माध्यमातून मिशन म्हणून सेवा कार्य सुरू आहे. नवजात बालक हे देशाचे भविष्य असून, त्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. नवजात बालकांसाठी आवश्याक असलेल्या दर्जेदार आरोग्य सेवा आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये एका छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याची माहितीही डॉ. कटारिया यांनी दिली.

बालरोगतज्ज्ञ डॉ. निखीलकुमार गुट्टे यांनी सांगितले की, लहान बालकांच्या आरोग्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अद्ययावत एनआयसीयू सेंटर कार्यान्वित असून, तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांची टीम रुग्णसेवेसाठी कार्यरत आहे. २६ बेडच्या अद्ययावत एनआयसीयू विभागामध्ये नवजात बालकांच्या श्वा,सोच्छवासाच्या त्रासावर उपचार करण्याची सुविधा उपलब्ध आहे. तसेच बालदमा, ए.आर.डी.एस. (श्वधसनदाह), नवजात बालकांच्या कावीळीसाठी फोटोथेरपी व रक्त बदलण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय अनुवंशिक आजार व जन्मजात आजारांचे निदान आणि उपचार, बालदमा तसेच लहान मुलांचे टू डी इको, एक्स-रे, पॅथॉलॉजी लॅब आणि डायलिसिस मशीनद्वारे सेवा उपलब्ध आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत शस्त्रक्रिया सुविधाही उपलब्ध असल्याचे डॉ. गुट्टे यांनी सांगितले. सध्या पावसाळ्यात व्हायरल आजारांचे प्रमाण वाढले असून, लहान बालकांच्या उपचारासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची टीम सज्ज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. दिपी अग्रवाल म्हणाल्या की, लहान बालकांचे लसीकरण हे भविष्यातील गंभीर आजार टाळण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे पालकांनी जागरूक राहून बालकांचे वेळोवेळी व नियमित लसीकरण करून घेणे आवश्यसक आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये सर्व प्रकारचे लसीकरण उपलब्ध असून, ते अल्पदरात करून दिले जात आहे. बालकांच्या जीवनाची सुरुवात लसीकरणाने होते. भविष्यातील विविध आजारांना प्रतिबंध करण्याबरोबरच त्यांच्याविरुद्ध प्रतिकारशक्ती निर्माण करण्यासाठी लसीकरण महत्त्वाचे असल्याने पालकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. अग्रवाल यांनी केले.

या मोफत बालरोग तपासणी शिबिराला नागरिक व पालकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. शिबिरामध्ये एकूण ६५ बालकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ बालरोग डॉक्टरांकडून बालकांची तपासणी करून आवश्यिक आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले.

सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले, तर आभार सतीश (बाबुशेठ) लोढा यांनी मानले.

## ग्राहकांना पूर्वसूचना न देता, कोणाचीही संमती न घेताच नगर शहरात परस्पर बसविले जात आहेत स्मार्ट मीटर

नगर – शहरात स्मार्ट मीटर बसविण्याचे काम वीज मंडळाने नियुक्त केलेल्या ठेकेदारांमार्फत सुरू आहे. मात्र, काही ठिकाणी ग्राहकांना पूर्वसूचना न देता तसेच त्यांची संमती न घेता मीटर बदलले जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. अपार्टमेंट व एकाच ठिकाणी अनेक वीज मीटर असलेल्या इमारतींमध्ये सोसायटीचे चेअरमन किंवा सदस्यांना पूर्वसूचना न देता ग्राहकांच्या अनुपस्थितीत सुस्थितीत असलेले जुने मीटर काढून त्याऐवजी स्मार्ट मीटर बसविल्याचे समोर आले आहे.



स्वाती शिरसुल

शहरात स्मार्ट मीटरला ग्राहकांकडून विरोध होत असताना ठेकेदाराकडून परस्पर नवीन स्मार्ट मीटर बसविले जात आहेत. त्यामुळे स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांचे गैरसमज प्रथम दूर करा आणि त्यानंतरच त्यांच्या संमतीने मीटर बसवा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे स्वाती सिरसुल यांनी केली आहे.

याबाबत सिरसुल यांनी सांगितले की, मीटर बदलल्यानंतर त्याची ऑनलाइन नोंदणी करून ते तातडीने कार्यान्वित केले जाते. त्यामुळे दुसऱ्या दिवशी मीटर बदलल्याचे ग्राहकाच्या निदर्शनास आले तरी जुना मीटर पुन्हा बसविणे किंवा बदलाबाबत तत्काळ आक्षेप नोंदविणे कठीण होते. या पद्धतीमुळे ग्राहकांमध्ये नाराजी निर्माण होत असून, ठेकेदारांच्या कामकाजावर वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांनी नियंत्रण ठेवण्याची गरज असल्याचे त्या म्हणाल्या.

तोफखाना परिसरातील मोची गल्ली, पंचरंग गल्ली व सातभाई गल्ली परिसरातून स्मार्ट मीटर बसविताना ग्राहकांच्या विरोधाचा विचार न केल्याच्या तक्रारी आल्याचे सिरसुल यांनी सांगितले. तसेच अपार्टमेंट व एकाच ठिकाणी अनेक वीज मीटर असलेल्या इमारतींमध्ये सोसायटीचे चेअरमन किंवा सदस्यांना पूर्वसूचना न देता मीटर बदलले जात असल्याच्या तक्रारीही त्यांनी मांडल्या. विशेषतः ग्राहकांच्या अनुपस्थितीत सुस्थितीत असलेले जुने मीटर बदलण्यात आल्याच्या तक्रारीही आल्या आहेत. त्यामुळे वीज वितरण कंपनीने प्रथम ग्राहकांना माहिती देऊन त्यांच्या शंकांचे निरसन करावे आणि त्यानंतरच स्मार्ट मीटर बसवावे, अशी मागणी त्यांनी केली.

स्मार्ट मीटरच्या अचूकतेबाबत आणि कार्यक्षमतेबाबत ग्राहकांमध्ये संभ्रम आहे. वापरलेल्या युनिटनुसार वीजबिल भरण्यास ग्राहकांची तयारी आहे; मात्र वापराच्या तुलनेत जास्त बिल येत असल्याच्या तक्रारी काही ग्राहकांकडून करण्यात येत आहेत. पूर्वी सातशे ते आठशे रुपये येणारे मासिक बिल स्मार्ट मीटरनंतर अडीच ते तीन हजार रुपयांपर्यंत येत असल्याच्या तक्रारी असल्याने ग्राहकांमध्ये भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रथम शहरातील सदोष व फॉल्टी मीटर बदलून त्या ठिकाणी स्मार्ट मीटर बसवावेत आणि त्यानंतर टप्प्याटप्प्याने, ग्राहकांना विश्वासात घेऊन स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया राबवावी, असे सिरसुल यांनी सुचविले.

दरम्यान, स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांच्या तक्रारींची दखल घेत स्मार्ट मीटरच्या शेजारी तीन महिन्यांसाठी चेक मीटर बसवून दोन्ही मीटरच्या नोंदींची पडताळणी करण्याची व्यवस्था करण्यात आल्याचे सांगत सिरसुल यांनी या निर्णयाचे स्वागत केले. या प्रक्रियेमुळे स्मार्ट मीटरच्या अचूकतेबाबत ग्राहकांच्या शंका दूर होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

वीज मंडळाचे अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार, शहर विभागातील कार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंते तसेच कनिष्ठ अभियंते यांनी तक्रारदार ग्राहकांशी सौजन्याने संवाद साधावा. स्मार्ट मीटरची कार्यपद्धती, बिलिंग प्रक्रिया आणि ग्राहकांचे अधिकार याबाबत त्यांना योग्य माहिती देऊन गैरसमज दूर करावेत. त्यानंतर ग्राहकांची संमती घेऊनच नवीन स्मार्ट मीटर बसविण्यात यावा, अशी मागणी स्वाती सिरसुल यांनी केली आहे.

## राजकीय स्वार्थासाठी ट्रस्टचा गैरवापर कोणी केला हे समाजाला माहित आहे

### राजेंद्र पडोळे यांचे प्रत्युत्तर, सकल माळी समाज ट्रस्ट बाबतही केले महत्वाचे खुलासे

नगर – आपण सकल माळी समाज ट्रस्टच्या लेटरहेडचा गैरवापर केल्याचा किशोर डागवाले यांनी केलेला आरोप धादांत खोटा असून, ही ट्रस्ट पूर्वी कोणाची होती, आणि राजकीय स्वार्थासाठी ट्रस्टचा गैरवापर कोणी केला हे सर्व समाजाला माहित आहे, कारण समाज सुज्ञ आहे. आपण जनहितासाठी आंदोलने केली आहेत, त्यात स्वतःचा कोणताही स्वार्थ नव्हता, असे प्रत्युत्तर राजेंद्र पडोळे यांनी दिले आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात पडोळे यांनी म्हंटले आहे की,२०२३ मध्ये किशोर डागवाले माझ्याकडे आले आणि मला म्हणाले की, तुझ्याकडे फॅमिली ट्रस्ट आहे त्यात तीन घरचे लोक आहेत, ते ट्रस्ट आम्हाला दे, आम्ही तुला एक कोटी रुपये देतो. माझे ट्रस्ट २०११ पासूनचे असून, त्या ट्रस्टला जागा आणि पैसे खूप मिळतील असे ते म्हणाले. म्हणूनच मी हे देण्यास तयार झालो होतो. पुढे ट्रस्टचे नाव बदलण्यासाठी मी वकीलामार्फत माझ्या व सर्व ट्रस्टींच्या सह्याही घेतल्या, परंतु डागवाले यांनी आज देतो, उद्या देतो असे म्हणत वेळ मारून नेत राहिले.

आमदार संग्राम जगताप यांच्या निवडणुकीच्या काळात डागवाले यांनी स्वतः पुढाकार घेऊन समाजाचा पाठिंबा मिळवून दिला. समाजात अशी चर्चा आहे की, या पाठिंब्याच्या बदल्यात त्यांनी मोठा आर्थिक लाभ घेतला. मुळात, जी संस्था पूर्वी 'पडोळे सेवा फाउंडेशन' म्हणून कार्यरत होती, तिचे नाव बदलून 'सकल माळी समाज ट्रस्ट' करण्यात आले आणि त्यानंतरच हे राजकारण सुरू झाले. डागवाले यांना आमदारांच्या माध्यमातून मिळणारा निधी आणि महापौरपदाचे स्वप्न पडले आहे. त्यामुळे त्यांनीच ट्रस्टचा गैरवापर केला असल्याचा आरोप पडोळे यांनी केला आहे.

माळी समाजाच्या मतावर ५ वेळा आमदार झालेल्या हिंदुत्ववादी आमदाराला समाजाने कधी उघड पाठींबा दिला नाही, तसेच विद्यमान आमदारांना ही समाजाने कधी उघड पाठींबा दिला नाही. मात्र आज राजकीय सोयीनुसार पक्ष बदलणारे नेते समाजात स्वार्थासाठी ट्रस्टचा आणि समाजाचा कसा वापर करत आहेत, हे सर्वांसमोर आहे. मी जनहितासाठी आंदोलने करत आलो आहे आणि त्यात माझा कोणताही वैयक्तिक स्वार्थ नव्हता. पडोळेमुळे महापौर बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांनी किमान आपली बदनामी करू नये, एवढीच माझी अपेक्षा आहे. समाजानेच आता हे ठरवावे की कोण बरोबर आहे आणि कोण चुकीचा, कारण समाज आता हुशार, सुज्ञ आणि जागरूक आहे. असेही पडोळे यांनी म्हंटले आहे.

## आनंदधाम येथे २३ ऑगस्टला गौतम निधी कलश वितरण व संकलन कार्यक्रम

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पुण्यभूमीत उपाध्याय प्रविणऋषी महाराज यांचा समर्पण चातुर्मास २०२६ भक्तीमय वातावरणात सुरू आहे. उपाध्यायश्रींच्या सान्निध्यात जप तप आराधना तसेच विविध धार्मिक कार्यक्रम होत आहेत. याअंतर्गत २३ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता आनंदधाम येथे गौतम निधी कलश वितरण व संकलन कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती गौतम लब्धी फाउंडेशनने दिली आहे.



उपाध्यायश्रीजींच्या प्रेरणेतून गेल्या १६ वर्षांपासून अहिल्यानगरमध्ये गौतम निधीचे कार्य सुरळीतपणे सुरू आहे. सेवा, शिक्षण आणि विकास या त्रीसूत्रीवर हे कार्य चालते. या माध्यमातून आजपर्यंत हजारो साधर्मिक कुटुंबांना रूग्णालय खर्च, शैक्षणिक खर्च तसेच व्यवसायासाठी आर्थिक मदत करण्यात आली आहे. समाजातील गरजूंना आपुलकीने मोठा आधार दिला जातो. गौतम स्वामींच्या प्रसादरूपी या सहकार्यामुळे आरोग्य, शिक्षण व विकासाच्या माध्यमातून हजारो कुटुंबे सक्षम होऊन प्रगतीच्या मार्गावर अग्रेसर आहेत.

रविवारी उपाध्यायश्रींच्या सान्निध्यात गौतम निधी कलश वितरण व संकलनाचा कार्यक्रम होणार आहे. समाजातील जास्तीत जास्त परिवारांनी आपल्या घरी गौतम निधी कलश स्थापित करून साधर्मिक सेवेचे पुण्य संपादन करावे. आपले छोटेसे योगदान कोणासाठी तरी वरदान ठरू शकते.

ज्या परिवारांकडे गौतम निधी कलश आहे, त्यांनी निधी संकलनासाठी तो सोबत घेऊन यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अ.नगर जिल्हा वाचनालय आयोजित निबंध स्पर्धेत अस्मि सप्तर्षि हिचे यश



नगर – अ.नगर जिल्हा वाचनालयातर्फे आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला (सावेडी) ची इयत्ता १० वीतील विद्यार्थिनी अस्मि अमोल सप्तर्षि हिला तृतीय क्रमांक प्राप्त झाला आहे.

या यशाबद्दल संस्थेकडून प्रशस्तीपत्र देवून तिचा सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## शालार्थ ई-केवायसीसाठी २० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ; शिक्षक भारतीच्या प्रयत्नांना यश : सुनील गाडगे

नगर – शालार्थ वेतन प्रणालीतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी राज्याच्या शिक्षण संचालनालयाने २० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. शिक्षकांना ई-केवायसी पूर्ण करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी, सर्व्हरची समस्या, माहिती अपडेट न होणे तसेच आधार व इतर कागदपत्रांशी संबंधित अडथळे लक्षात घेऊन शिक्षक भारतीने केलेल्या मागणीला अखेर यश आले आहे. त्यामुळे राज्यातील शालार्थ प्रणालीद्वारे वेतन घेणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे, अशी माहिती शिक्षक नेते तथा शिक्षक भारतीचे राज्यसचिव सुनील गाडगे यांनी दिली.

महाराष्ट्र शासनाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने १८ ऑगस्ट २०२६ रोजी यासंदर्भात परिपत्रक जारी केले आहे. खाजगी व्यवस्थापनाच्या अंशतः अनुदानित, अनुदानित तसेच जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शालार्थ प्रणालीद्वारे वेतन घेणाऱ्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे ई-केवायसी २० सप्टेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

यापूर्वी ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी ऑगस्ट २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, क्षेत्रीय स्तरावर कामाचा आढावा घेतल्यानंतर ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आणखी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने ही मुदत वाढविण्यात आली आहे. २० सप्टेंबरपर्यंत ई-केवायसी पूर्ण न केल्यास संबंधित शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे ऑक्टोबर २०२६ चे वेतन नोव्हेंबर २०२६ मध्ये आहरित करण्यात येणार नसल्याचे परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच यापुढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

या मागणीसाठी शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे उपाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, जिल्हा सचिव विजय कराळे, जिल्हा कार्याध्यक्ष संजय पवार, पुणे विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, कार्यवाह संजय भुसारी यांच्यासह कैलास जाधव, योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सुदाम दिघे, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संतोष देशमुख, किसन सोनवणे, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, विभावरी रोकडे, मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुंज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर तसेच विनाअनुदानित राज्याध्यक्ष रूपाली कुरूमकर आदींनी या मागणीसाठी पाठपुरावा केला.

